सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २४१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २५ ऑक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## मोदींच्या हत्येचा कट रशियाने उधळला?

### अमेरिकेचा एजंट ढाक्यामध्ये मारला गेला, चर्चांना उधाण...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हत्येचा कट अमेरिकेची गुप्तचर संस्था सीआयएने रचल्याचा खळबळजनक दावा करण्यात आला आहे. हा कट रशियाच्या मदतीने उधळून लावण्यात भारतीय सुरक्षा यंत्रणांना यश आले आहे. बांगलादेशची राजधानी ढाका येथील एका अमेरिकन राजनैतिक अधिकाऱ्याच्या 'रहस्यमय' मृत्यूवरून हा दावा करण्यात येत असून यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी खळबळ उडाली आहे.

पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी चीनमध्ये एकाच कारमधून प्रवास केला होता. या



दौऱ्यावरून परतल्यानंतर मोदी यांनी एका कार्यक्रमात मी चीनला गेलेलो म्हणून टाळ्या वाजवताय की, चीनवरून परत आलो म्हणून वाजवताय, असा सवाल केला होता. मोदी यांच्या अशा वक्तव्याने सर्वांच्याच मनात संशयाची पाल चुकचुकली होती. यावरून आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञांनी मोठ्या आंतरराष्ट्रीय षडयंत्राची शक्यता व्यक्त करत एकेक कडी जोडली आहे.

टेरेन्स जॅक्सन हा अमेरिकेचा महत्वाचा अधिकारी जो यापूर्वीच्या अमेरिकेच्या परदेशांतील सर्व ऑपरेशन्सचा प्रमुख चेहरा होता, त्याचा ३१ ऑगस्टला ढाक्यातील एका हॉटेलमध्ये मृत्यू झाला होता. जॅक्सनचा मृत्यू या कटाशी संबंधित असू शकतो, अशी शक्यता वर्तविण्यात आली आहे. ऑर्गनायझर या वृत्तपत्राने हा खळबळजनक दावा केला आहे.

**रशियाची गुप्त माहिती**


या वृत्तानुसार, पंतप्रधान मोदींना लक्ष्य करण्याचा 'सीआयए'चा कट होता. पण, भारताच्या विश्वासू मित्र असलेल्या रशियाने गुप्त माहिती पुरवून भारताला वेळीच सावध केले. रशियाकडून मिळालेल्या अचूक माहितीच्या आधारे भारतीय सुरक्षा दलांनी तातडीने कारवाई करत हा मोठा कट उधळून लावला.जॅक्सनला बांगलादेशात सेंट मार्टिन बेटावर बांगलादेश सैन्याला प्रशिक्षण देण्यासाठी तैनात करण्यात आले होते, असे सांगितले जात असले तरी त्याचा मूळ उद्देश वेगळाच होता. ज्या दिवशी जॅक्सन मृतावस्थेत सापडला त्याच दिवशी मोदी शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी चीनमधील तियानजिन येथे होते.

## बावनकशी सोनं पुन्हा झळाळलं, रोहित शर्मा १२१ नाबाद

### विराट रोहित ची १६८ रनची नॉट आऊट भागीदारी भारताने तिसरा एकदिवसीय सामना ९ विकेटने जिंकला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५सिडनी**

तब्बल १० किलो वजन घटवून स्वत:मध्ये आमुलाग्र कायापलाट घडवून आणणारा भारतीय संघाचा फलंदाज रोहित शर्मा याने शनिवारी सिडनीच्या मैदानावर आपण अजूनही बावनकशी सोनंच असल्याचं दाखवून दिले. गेल्या सामन्यात ७४ धावा झळकावणाऱ्या रोहित शर्मा याने सलग दुसऱ्या सामन्यात संयमाने मोठी खेळी साकारत आपल्या टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले. रोहित शर्मा याने १०५ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. कोहली आणि रोहितची दुसऱ्या विकेटसाठीची भागीदारी १३०+ धावांची झाली. यासह, रोहित ऑस्ट्रेलियामध्ये







एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक शतके करणारा फलंदाज बनला आहे.तर भारताने तिसरी वन डे ९ विकेटने जिंकली.

**रोहित शर्माचं एकदिवसीय कारकिर्दीतील ३३ वे शतक**

भारतीय संघाचा अनुभवी फलंदाज रोहित शर्माने त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील ३३ वे शतक झळकावले. सिडनी क्रिकेट ग्राउंडवर खेळल्या जाणाऱ्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात त्याने १०५ चेंडूत ११ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने शानदार शतक झळकावले. ॲडलेडमध्ये ७३ धावांची शानदार खेळी करणाऱ्या रोहितने सिडनीमध्ये शानदार फलंदाजी करत शानदार शतक झळकावले. रोहित शर्माचे हे या वर्षातील दुसरे शतक आहे. यापूर्वी त्याने फेब्रुवारीमध्ये इंग्लंडविरुद्ध शानदार शतक झळकावले होते. सिडनीमध्ये शतक झळकावल्यानंतर रोहितने त्याच्या निवृत्तीबद्दल अटकळ बांधणाऱ्या टीकाकारांना चोख उत्तर दिले आहे.

## महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात मोठी कारवाई

### आरोपी प्रशांत बनकरला अटक;पहाटे ४ च्या सुमारास पुणे परिसरात ठोकल्या बेड्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५सातारा-वडवणी**

माझ्यावर चार वेळा अत्याचार करण्यात आले. माझा प्रचंड मानसिक छळ झाला. माझ्या मरण्याचे कारण पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने असून त्याने माझ्यावर चार वेळा अत्याचार केला. प्रशांत बनकरने मानसिक आणि शारीरिक त्रास दिला, असे तळहातावरील सुसाइड नोटमध्ये लिहून फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरने भाऊबीजेच्या दिवशी जीवन संपवले होते. या प्रकरणातील प्रशांत बनकरला आता पोलिसांनी अटक केली आहे. तर गोपाल बदनेचाही कसून शोध सुरु आहे.

या प्रकरणातील महिला डॉक्टर या बीड जिल्ह्यातील वडवणी येथील मूळ रहिवासी होत्या. त्यांचे वडील अल्पभूधारक शेतकरी आहेत. या प्रकरणी पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने अद्यापही फरार आहेत. मूळ परळी येथील रहिवासी असलेल्या बदनेवर निलंबनाची कारवाईही करण्यात आली आहे. बनकर





सामान्य नागरिक असल्याचा पोलिस अधिकाऱ्यांचा दावा आहे.

**मध्यरात्री सापळा रचून पहाटे चारच्या सुमारास पुणे परिसरात कारवाई**

या प्रकरणात मुख्य आरोपी प्रशांत बनकरला पोलिसांनी अखेर अटक केली आहे. या घटनेनंतर पोलिसांनी वेगवान तपास सुरू करत अनेक ठिकाणी छापे टाकले. प्रशांत बनकर फरार झाल्यानंतर तो आपल्या एका मित्राच्या फार्महाऊसमध्ये लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर सातारा ग्रामीण पोलिसांच्या पथकाने मध्यरात्री सापळा रचून पहाटे चारच्या सुमारास पुणे परिसरात ही कारवाई केली. पोलिसांनी फार्महाऊसला वेढा घालून त्याला बेड्या ठोकल्या. अटकेनंतर बनकरला फलटण शहर पोलिस ठाण्यात आणण्यात येणार असून, त्याची सखोल चौकशी केली जाणार आहे. दरम्यान, दुसरा आरोपी जो पोलिस असल्याचे सांगितले जाते, तो अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे. प्रशांत बनकरला अटक झाल्याने या प्रकरणाच्या तपासाला वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


## पाच पिढ्यांची साक्षीदार 'विठाबाई'

### महाराष्ट्रातील ज्येष्ठ आजीबाईचे ११४ व्या वर्षी निधन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ ठाणे**

महाराष्ट्रातील वयाने सर्वात मोठ्या मानल्या जाणाऱ्या विठाबाई दामोदर पाटील (वय ११४) यांचे आज सकाळी ६ वाजता निधन झाले. पाच पिढ्या आपल्या छायेखाली वाढताना पाहण्याचे भाग्य लाभलेल्या या आजीबाईंनी आपल्या शतकभराच्या आयुष्यात काळाचे अनेक टप्पे, बदलती पिढी, परंपरा आणि संस्कृतीचे रूपांतर जवळून अनुभवले.

दरवेळी काठी टेकत मतदान केंद्रात हजेरी लावणाऱ्या विठाबाई या लोकशाहीच्या संस्कारांचा जिवंत आदर्श होत्या. त्यांना पाहण्यासाठी मतदारांच्या रांगाही वाट पाहत असत. पत्रकारांनीही दरवेळी त्यांच्या कौतुकाने बातम्या केल्या होत्या. देश बदलला, सरकारे बदलली, पण मतदानाचा त्यांचा निश्चय कधीच ढळला नाही.विठाबाई यांचा जन्म १९०१ साली शिळगाव (कल्याण) येथे झाला. विवाहानंतर त्या कोपरी गावात स्थायिक झाल्या. आयुष्यभर आगरी-कोळी परंपरेचे मूल्य, कष्ट आणि मातीशी नाळ



जपणाऱ्या या कणखर मातोश्री होत्या. त्यांच्या मागे सहा मुले, सहा सुना, नातवंडे, पतवंडे असे मोठे कुटुंबीय जाळे आहे. त्या गवदेवीचे अध्यक्ष यांच्या मातोश्री होत्या. आज सकाळी ६ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अंत्यसंस्कार सकाळी ११ वाजता कोपरी स्मशानभूमी येथे करण्यात आले. परंपरेनुसार १०० वर्षे पार केलेल्या ज्येष्ठांना आदरार्थ भजन मंडळ, ब्रास बँड आणि फटाक्यांच्या साक्षीने अंत्ययात्रेला सन्मान दिला जातो, तसा त्यांचा सन्मान करण्यात आला.

ही आमच्या समाजाची कृतज्ञतेची परंपरा आहे, असे नात जावई हेमंत पाटील यांनी सांगितले. विठाबाईंच्या जाण्याने कोपरी गावावर एक युग संपल्याची भावना दाटून आली आहे.

## एकनाथ शिंदे अचानक दिल्लीत दीड तास पंतप्रधान मोदींसोबत बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

महाराष्ट्रात महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भाजप-शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात महायुती आणि जागावाटपावर चर्चा सुरू असताना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे थेट दिल्लीत गेले. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या दोन्ही नेत्यांमध्ये दीड तास बैठक झाल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीत त्यांच्यात नेमकी काय चर्चा झाली याची स्वतः एकनाथ शिंदे यांनी माध्यमांना माहिती दिली.

एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत पंतप्रधान मोदी यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांना दिवाळी आणि नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शिंदेंनी



मोदींना शाल, पुष्पगुच्छ आणि संत तुकाराम महाराज यांची मूर्ती भेट दिली. या बैठकीत केंद्र आणि राज्यातील अनेक महत्वाच्या विषयांवर चर्चा झाली.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (छऊ-) सर्व घटक पक्षांनी एकाच विचाराने एकत्रित राहावे आणि महायुती मजबुतीनं काम करत राहायला हवी, अशी अपेक्षा यावेळी पंतप्रधान मोदींनी व्यक्त केल्याचे समजते. यावेळी मोदींनीही एकनाथ शिंदे आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी ही भेट होती, असे सांगितले जात असले तरी, राजकीय आणि प्रशासकीय दृष्टीने या भेटीला महत्व असल्याचे मानले जात आहे. कारण या बैठकीत राज्य आणि केंद्राचे सहकार्य आणि आगामी योजनांच्या रणनीतीवरही चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे.

## खगरियात तेजस्वींची सभा रद्द, म्हणाले- ही हुकूमशाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि..२५पाटणा**

शनिवारी खगरिया येथे होणारी राजद नेते तेजस्वी यादव यांची रॅली रद्द करण्यात आली आहे. तेजस्वी यांनी याला हुकूमशाही म्हटले आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्यामुळे जिल्हा प्रशासनाने त्यांच्या हेलिकॉप्टरला उतरण्यास परवानगी नाकारली.

शाह आज खगरिया, मुंगेर आणि बिहार शरीफ येथे जाहीर सभा घेणार आहेत. दरम्यान, राजदने तेजस्वी यांचे पोस्टर लावले आहेत, ज्यात त्यांना बिहारचा हिरो



म्हटले आहे. पप्पू यादव यांनी उत्तर दिले, मी बिहारचा पुत्र आहे. मी एक सेवक आहे. मी नेहमीच त्यांचा पुत्र आणि सेवक राहीन. मला हिरो होण्याची इच्छा नाही.

दरम्यान, खगरिया येथे होणारी तेजस्वी यांची रॅली रद्द करण्यात आली आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्यामुळे जिल्हा प्रशासनाने त्यांच्या हेलिकॉप्टरला उतरण्यास परवानगी नाकारली. दरम्यान, पैसे वाटल्याबद्दल आयकर विभागाने पप्पू यादव यांना नोटीस बजावली आहे.

## अमृता फडणवीसांचे नवे गाणे कोई बोले राम राम, कोई खुदाए

### प्रेक्षकांकडून भरभरून प्रतिसाद; सोशल मीडियावर गाण्याचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी आणि गायिका अमृता फडणवीस या पुन्हा एकदा संगीतविश्वात चर्चेचा विषय ठरल्या आहेत. त्यांच्या आवाजातील नवे गाणे कोई बोले राम राम, कोई खुदाए नुकतंच टी-सीरिजच्या अधिकृत यूट्यूब चॅनलवर प्रदर्शित झाले असून, या गाण्याला प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. गाण्याच्या माध्यमातून धार्मिक सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अमृता फडणवीस यांच्या आवाजात आणि भावपूर्ण सादरीकरणात साकारलेले हे गीत अल्पावधीतच व्हायरल झालं आहे. चाहत्यांकडून सोशल मीडियावर गाण्याचं कौतुक होत असून, त्यांच्या या नव्या कलाकृतीला शांततेचा संदेश देणारं गीत म्हणून प्रतिसाद मिळतो आहे.

संगीताच्या दुनियेत अमृता फडणवीस यांचं नाव गेल्या काही वर्षांत आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. बँकिंग क्षेत्रात उच्चपदावर कार्यरत असतानाही त्यांनी गायनाची आवड जपली आहे. सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग, संगीतावरील प्रेम आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी या तीनही गोष्टी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं वैशिष्ट्य ठरल्या आहेत. कोई बोले राम राम, कोई खुदाए हे गाणं



त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाचा विस्तार असल्याचं अनेक संगीतप्रेमींनी नमूद केलं आहे.

टी-सीरिजसारख्या आघाडीच्या संगीत संस्थेच्या बॅनरखाली हे गाणं प्रदर्शित झाल्याने त्याला अधिक व्यापक पोहोच मिळाली आहे.

अमृता फडणवीस या याआधीही अनेक प्रसंगी संगीत आणि समाजकार्य या दोन्ही क्षेत्रांत आपला ठसा उमटवत आल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर त्यांनी स्वतः लिहिलेलं देवाधिदेव तू महादेव हे गीत प्रदर्शित केलं होतं. त्या गाण्याला प्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांनी आवाज दिला होता, तर स्वतः अमृता फडणवीसही त्या गीतात सहभागी झाल्या होत्या. देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेल्या या गाण्याचं सादरीकरण सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रिय झालं होतं. त्यामुळे त्यानंतरचं कोई बोले राम राम, कोई खुदाए हे नवीन गाणं येणं म्हणजे त्यांच्या संगीत प्रवासातील आणखी एक टप्पा ठरला आहे.

राज्याच्या राजकारणातील व्यस्त वातावरणात अमृता फडणवीस नेहमीच आपली वेगळी ओळख जपतात. त्या फक्त मुख्यमंत्र्यांच्या पत्नी नाहीत, तर एक यशस्वी बँकर, कलाकार आणि समाजसेविका म्हणून त्यांनी स्वतःचा स्वतंत्र मार्ग तयार केला आहे. क्सिस बँकेत गेल्या सतराहून अधिक वर्षांपासून कार्यरत असलेल्या अमृता यांनी आपल्या करिअरची सुरुवात एक्झिक्युटिव्ह कॅशियर म्हणून केली होती. त्यानंतर त्या नागपूर शाखेच्या प्रमुखपदी आणि नंतर मुंबईतील कॉर्पोरेट कार्यालयातील उपाध्यक्षपदी पोहोचल्या. व्यावसायिक जबाबदाऱ्यांसोबतच त्यांनी समाजातील अनेक उपक्रमांमध्ये सहभाग घेत, महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध कार्यक्रमांद्वारे कार्य केलं आहे.

## संपादकीय ......

# घरातले कोण आणि बाहेरचे कोण?

दिवाळी साजरी झाली. लोक कामासाठी परत आले. बर्याच लोकांची कर्मभूमी वेगळी असते आणि मूळ गाव वेगळे असते. गावी असलेले आई-वडील आणि इतर आप्तस्वकीय यांना भेटण्याची संधी दिवाळीच्या निमित्ताने मिळत असते. पुण्यासारख्या महानगरांमध्ये दिवाळीत रस्त्यांवर गर्दी कमी होती आणि एकंदरीतच शहरामध्ये सामसूम होती. याचे कारण म्हणजे लोक गावी गेले होते. पुण्यातील काही तरुणांनी गावी जाणार्या लोकांना 'तिकडेच राहा, परत येऊ नका' असे फलक दाखवले ज्याची फार मोठी चर्चा सोशल मीडियावर झाली. या फलकांवरून बाहेरून येऊन पुण्यात स्थायिक झालेल्या लोकांबद्दलचा राग दिसून आला. असे फलक दाखवणार्या व्यक्ती तरी मूळ पुण्याच्या आहेत का, हा मोठाच प्रश्न आहे.

खरे तर, चांगल्या संधीच्या शोधात लोक इकडून तिकडे जात असतात. भारतीय लोक मोठ्या संख्येने अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इंग्लंड या देशांमध्ये गेल्यामुळे तिथेही हाच प्रश्न उभा राहिला. अमेरिका आणि कॅनडामध्ये भारतीय लोकांविरुद्ध मोर्चे काढण्यात आले. तिथे भारतीय लोक हे बाहेरचे होते. मुंबईत हा प्रश्न अधूनमधून उभा राहत असतो. परप्रांतातून आलेल्या लोकांना आपण बाहेरचे समजतो. इतर देशांत आपण जातो तेव्हा आपण बाहेरचे असतो. आपल्याच प्रदेशातील लोक आपल्याच एखाद्या शहरात येतात तेव्हा तेही बाहेरचे असतात. त्यामुळे नेमके घरचे कोण आणि बाहेरचे कोण, हे समजण्यास मार्ग राहिलेला नाही.

'हे विश्वचि माझे घर' अशी संकल्पना मांडणार्या भारतीय संस्कृतीमध्ये आपल्याच लोकांना बाहेरचे समजण्याची ही भावना आली आहे. नवीन पिढीतील प्रत्येक मुलगा हा इथून पुढे फक्त भारताच नव्हे, तर जगाचा नागरिक असणार आहे. उदाहरणादाखल इंग्लंडचे माजी पंतप्रधान ऋषी सुनक. त्यांचे वडील रामदास सुनक यांनी १९३५ मध्ये गाव सोडले तेव्हा त्यांचे गुजरानवाला हे मूळ गाव भारतात होते. आता ते पाकिस्तानात आहे. तिथून पोटासाठी रामदास आफ्रिकेतल्या नैरोबीत आले. पुढे केनियात राहिले. पुढे १९६० मध्ये सुनक कुटुंब इंग्लंडमध्ये गेले. तिथे ऋषी सुनक यांचा १९८० मध्ये जन्म झाला. नंतर ऋषी सुनक इंग्लंडचे पंतप्रधान झाले. गमतीचा भाग असा की, ते मूळचे भारतीय आहेत. तांत्रिकदृष्ट्या पाकिस्तानचे आहेत. आफ्रिकेचे आहेत आणि केनियाचेपण आहेत. इंग्लंडचे ते नागरिक आहेतच आणि ती त्यांची जन्मभूमीही आहे. आशिया, आफ्रिका, युरोप या तीन खंडांचे ते आहेत, शिवाय त्यांच्याकडे अमेरिकेचे नागरिकत्व आहे ते वेगळेच.औरंगाबाद म्हणजेच आताच्या छत्रपती संभाजीनगरची स्थापना करणारा मलिक अंबर हा मूळचा इथिओपिया या देशाचा होता. विचार करायला गेले, तर इथून पुढच्या जगात कोणीच आतले आणि बाहेरचे असणार नाही. सगळे जगच विस्तारत चाललेले आहे, हे जेवढे लवकर लक्षात येईल तेवढे चांगले असे म्हणावे लागेल.

# आंतरराष्ट्रीय बाजारात गाईच्या शेणाला प्रचंड मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५** आंतरराष्ट्रीय बाजारात गाईच्या शेणाची प्रचंड मागणी असून भारताने तब्बल ३०० कोटी रुपयांच्या शेणाची निर्यात केली आहे.

भारत जवळपास दहा देशांना शेणाची निर्यात करीत असून या यादीत अमेरिका दुसऱ्या, तर चीन चौथ्या क्रमांकावर आहे.भारताने २०२४-२५ मध्ये १२५ कोटी रुपये किमतीच्या ताज्या शेणाची आणि १७३.७ कोटी रुपयांचे शेणखत असे २९८ कोटी ७० लाख रुपयांच्या शेणखताची निर्यात केली आहे.

भारतातून गाईचे शेण आयात करणाऱ्या देशांमध्ये कुवैत, मालदीव, अमेरिका, सिंगापूर, चीन, नेपाळ, ब्राझिल, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, कुवैत, संयुक्त अरब अमिरात आणि न्यूझीलंड या देशांचा समावेश आहे. यातही कुवैतने सर्वाधिक शेण खरेदी केले आहे. २०२४ मध्ये कुवैतने १९२ मेट्रिक टन शेण खरेदी केले होते. कुवैत गाईच्या शेणाचा वापर खजूरचे उत्पादन करण्यासाठी करीत आहे.

**दिवसाला मिळते ३० लाख टन शेण**

नीती आयोगानुसार, भारतात ३० कोटी गाई असून त्यांच्यापासून एका दिवसात ३० लाख टन शेण मिळते.

यात पहिल्या क्रमांकावर राजस्थान आहे.

यानंतर उत्तर प्रदेश व महाराष्ट्राचा क्रमांक लागतो.

भारतातील १८१ व्यावसायिकांनी जगभरातील ३२७खरेदीदारांना शेणाची निर्यात केली आहे.




जर्मनीचे राजदूत डॉ. फिलिए एकरमॅन यांनी अलीकडेच गोमूत्र आणि शेणाला 'डिप्लोमॅटिक टूल' म्हटले आहे.

शेण आणि गोमूत्रापासून जमिनीची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी जर्मन विकास बँकेने आंध्रप्रदेशातील महिलांना आर्थिक साहाय्य दिले आहे.

# मोठी विमान दुर्घटना टळली, नागपूरहून उड्डाण घेताच पायलटला इंजिनमध्ये कंपन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५नागपूर-** नागपूरहून दिल्लीला जाणारे एअर इंडियाचे विमान उड्डाण केल्यानंतर अवघ्या काही मिनिटांत नागपुरात परतले. उड्डाणानंतर विमानाच्या इंजिनमध्ये कंपन जाणवल्याने वैमानिकाने तत्काळ विमान परतण्याची परवानगी मागितली. विमान सुरक्षितपणे उतरल्यावर वैमानिकाने संशय व्यक्त केला की उड्डाणादरम्यान विमानाला पक्षी धडकला असावा.

विमानाची तपासणी केल्यानंतर तांत्रिक कारणास्तव ते विमान सध्या ग्राउंड करण्यात आले आहे, अशी माहिती विमानतळ सूत्रांनी दिली. शुक्रवारी सायंकाळी सुमारे ६.४० वाजता एअरबस ३२० विमानाने उड्डाण केले होते. त्यावेळी सुमारे १५० प्रवासी विमानात होते. प्रवाशांना नंतर प्रवास भाडे परत करण्यात आले.



विमानतळ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, उड्डाणाच्या अवघ्या पाच मिनिटे आधी इंडिगो एअरलाइन्सचे दिल्लीसाठी दुसरे विमान उडाले होते, ते मात्र सुरक्षितपणे गंतव्यस्थानी पोहोचले. रात्रीच्या वेळी उड्डाण झाल्याने पक्षी रात्री उडणाऱ्या पक्ष्याची धगकण्याची शक्यता नाकारता येत नाही. विमानतळ परिसरात २४ तास पक्षी निरीक्षक तैनात असले तरी रात्री पक्षी ओळखणे कठीण जाते. दिवाळीच्या काळात फटाक्यांच्या आवाजामुळे पक्षी विमानतळ परिसरातून दूर जातात, असे एका अधिकाऱ्याने नमूद केले.अलीकडच्या काळात नागपुरात ही दुसरी घटना आहे. गेल्या महिन्यातही एअर इंडियाच्या विमानाला पक्षीधडक बसून त्याच्या नोजकोनला नुकसान झाले होते. त्या वेळी धावपट्टीवर गरुड पक्षी धडकले होते.





## सतत एका जागी बसून काम करणे धोकादायक; किडनीवर होतो परिणाम?

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

किडनी स्टोनचा धोका : बैठ्या जीवनशैलीमुळे आणि एसीमध्ये जास्त वेळ राहिल्यामुळे पाणी कमी पिण्याची सवय लागते आणि शरीरात मुतखडा तयार होतो. २० ते ४० वयोगटातील तरुणांमध्ये किडनी स्टोनचे प्रमाण वाढण्यामागे बैठी जीवनशैली हे प्रमुख कारण आहे.

रक्तदाब वाढणे : शारीरिक हालचालींच्या अभावामुळे रक्तदाब वाढतो. उच्च रक्तदाब हा किडनी खराब होण्याचे एक मुख्य कारण आहे. वाढलेला रक्तदाब किडनीतील रक्तवाहिन्यांवर ताण टाकतो आणि त्यांच्या फिल्टरिंग क्षमतेवर नकारात्मक परिणाम करतो.लघवी साठवून ठेवण्याची सवय : कामात व्यस्त असताना अनेकजण लघवीला जाणे टाळतात किंवा ती जास्त वेळ अडवून ठेवतात. संशोधनानुसार, ८ तासांपेक्षा जास्त वेळ बसल्याने व लघवी अडवून ठेवल्याने यूटीआय आणि किडनीच्या कार्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.



पाणी भरपूर प्या : दिवसातून किमान ३ ते ४ लिटर पाणी पिणे आवश्यक आहे.

नियमित ब्रेक घ्या : कामात दर ३० ते ४५ मिनिटांनी खुर्चीवरून उठा. ५ मिनिटांचा छोटा ब्रेक घ्या.

सक्रिय राहा : दिवसातून किमान ३० मिनिटे मध्यम स्वरूपाचा व्यायाम (चालणे-धावणे-योगा).

मीठ-साखरेवर नियंत्रण : आहारात मीठ-साखरेचे प्रमाण कमी ठेवा. जास्त मीठ रक्तदाब वाढवते.

पेनकिलर टाळा : डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वेदनाशामक औषधे घेऊ नका. त्यांचा किडनीवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

अनेक तास एकाच जागी बसून काम करणे, शारीरिक हालचालींचा अभाव असणे या गोष्टी सामान्य झाल्या आहेत. मात्र, अशा प्रकारची निष्क्रिय जीवनशैली केवळ वजन वाढवण्यासाठी किंवा हृदयविकारांसाठीच नव्हे, तर तुमच्या शरीरातील एका महत्त्वाच्या अवयवासाठी म्हणजेच किडनीसाठी गंभीर धोका निर्माण करू शकते. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, बैठ्या जीवनशैलीचा थेट आणि अप्रत्यक्ष परिणाम किडनीच्या कार्यावर होतो.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणजे एक विचार, एक प्रेरणास्रोत- राज्यपाल आचार्य देवव्रत

## राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या हस्ते लेखक बर्जिस देसाई लिखित मोदीज मिशन पुस्तकाचे प्रकाशन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई,** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे केवळ भारताचे नेते नाहीत, तर ते एक विचार आहेत, एक प्रेरणास्रोत आहेत. त्यांचे जीवन हे मानवतेच्या सेवेचे आणि राष्ट्रहितासाठीच्या अखंड समर्पणाचे उत्तम उदाहरण आहे, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.



लेखक बर्जिस देसाई लिखित मोदीज मिशन या पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यांच्या हस्ते राजभवन येथे झाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, लेखक बर्जिस देसाई तसेच अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या आयुष्यात अनेक अशक्य वाटणारे निर्णय घेतले, जसे कलम ३७० रद्द करणे, रामजन्मभूमीचा प्रश्न शांततेत सोडवणे. तसेच जागतिक स्तरावर भारताचा सन्मान वाढवणे, हे त्यांच्या दृढ इच्छाशक्तीचे द्योतक असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यपाल देवव्रत म्हणाले की, प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या २५ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत एकही दिवस सुटी घेतलेली नाही. देश, समाज आणि मानवतेच्या सेवेसाठी सतत कार्य करणे, हीच त्यांची साधना आहे.

राज्यपालांनी लेखक बर्जिस देसाई यांचे अभिनंदन करताना म्हटले की, या पुस्तकात प्रधानमंत्री मोदी यांच्या जीवनातील विविध पैलूंना सखोलतेने स्पर्श केला असून, हे पुस्तक तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल. सर्वांनी हे पुस्तक वाचून, त्यातील विचारांद्वारे आपल्या जीवनात प्रेरणा घ्यावी. प्रधानमंत्री मोदी हे देशाच्या सन्मानाचे प्रतीक आहेत; त्यांचे कार्य हे प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद असल्याचेही राज्यपाल देवव्रत म्हणाले.

**'मोदीज मिशन' पुस्तकातून राष्ट्रनिर्मितीच्या प्रवासाचे दर्शन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताच्या विकासाची जी पायाभरणी केली आहे, ती अवर्णनीय आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मोदीज मिशन या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या पुस्तकात प्रधानमंत्री मोदी यांच्या जीवनाचा केवळ आढावा घेतलेला नाही, तर एका व्यक्तीच्या मूल्यांची, जाणीवेची आणि राष्ट्रासाठी झटण्याच्या वृत्तीची निर्मिती कशी होते, हे दाखवले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सेवा आणि संन्यास या दोन्ही मार्गांचा अनुभव घेतल्यानंतर, संघकार्याद्वारे राष्ट्रभावना जागृत करण्याचा संकल्प केला. त्यांच्या नेतृत्वाखाली देशात ३७० कलम रद्द करणे, राम मंदिर उभारणी, नागरिकत्व कायदा किंवा तिहेरी तलाक बंदी यांसारख्या ऐतिहासिक निर्णयांचा साक्षीदार झाला आहे. या सर्व निर्णयांच्या मागे राष्ट्रचेतनेची जाणीव असल्याचे त्यांनी सांगितले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी न्यायव्यवस्थेचा सन्मान राखला आणि संस्थांना अधिक मजबूत केले. सरकार आणि न्यायसंस्था यांच्यातील संतुलन राखत त्यांनी लोकशाही संस्थांवरील विश्वास अधिक दृढ केला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हणाले.

अर्थव्यवस्थेसंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरच्या माध्यमातून भारताने जगातील विकसित अर्थव्यवस्थांनाही मागे टाकले आहे. नोटबंदी, जीएसटी आणि आयकर सुधारणा यांसारख्या उपाययोजनांनी करपालन संस्कृती रुजवली. पूर्वी कर टाळणे 'पुरुषार्थ' मानणाऱ्या समाजात आता करपालन ही नवी मूल्यव्यवस्था तयार झाली आहे.प्रधानमंत्री मोदी यांनी समाजातील गरीब, शेतकरी, युवा आणि महिला हेच भारताच्या आकांक्षांचे केंद्र मानले. या चार घटकांच्या उन्नतीतच विकसित भारताचा पाया असून 'मोदीज मिशन' पुस्तक भारताच्या विकासगाथेचा आरसा आहे असेही श्री.फडणवीस म्हणाले.

**मोदी म्हणजे देशाचे वर्तमान आणि भविष्य _उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे-** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे फक्त एक व्यक्तिमत्व नाहीत, तर देशाचे वर्तमान आणि भविष्य आहेत. त्यांच्या कामगिरीचा प्रवास संघर्षमय असून, तो प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे, असे उद्गार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'मोदीज मिशन' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी काढले.

हे पुस्तक फक्त नरेंद्र मोदींच्या चरित्राचे वर्णन नाही, तर त्यांच्या कार्याची सत्यकथा आहे. मोदींच्या व्यक्तिमत्वाची व्याप्ती एका पुस्तकात सामावणे शक्य नाही, कारण त्यांनी अशक्याला शक्य करून दाखवले आहे. मागील अकरा वर्षांत भारतात झालेले सकारात्मक बदल जगभरात कौतुकास्पद ठरले आहेत, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.जगातील अर्थव्यवस्था डगमगली असतानाही भारताची अर्थव्यवस्था चौथ्या स्थानी आली आहे आणि तिसरे स्थान मिळविण्याचे स्वप्न साकार होईल. 'डिजिटल इंडिया', 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' यांसारख्या उपक्रमांचा उल्लेख करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढणे, महिलांना आत्मनिर्भर बनविणे, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देणे, हे सर्व मोदींच्या नेतृत्वामुळे शक्य झाले.या कार्यक्रमात मोदीज मिशन पुस्तकाचे लेखक बर्जिस देसाई यांनीही विचार मांडले.

# ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी शिबिर संपन्न विविध बँकांच्या १४८ खातेदारांचे ३.५२ कोटी रुपयांचे खाते पुर्नजीवित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती,**

ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत मिळाली नसलेल्या आर्थिक मालमत्तांच्या निकालीकरणासाठी आज जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता फंड या शिबिराचे आयोजन जिल्हाची अग्रणी बँक सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या पुढाकाराने अभिनंदन को ऑपरेटिव बँकेच्या सभागृहामध्ये करण्यात आले. या शिबिरामध्ये विविध बँकांच्या १४८ खातेदारांचे ३.५२ कोटी रुपयांचे खाते पुर्नजीवित (क्टिवेट) केले गेले.अभिनंदन बँकेचे अध्यक्ष विजय बोथरा, रिजर्व बँकेचे सहायक महाप्रबंधक विनोद कुमार के., अभिनंदन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी देठे, अभिनंदन बँकेचे व्यवस्थापकीय अध्यक्ष सुदर्शन गांग, सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक सुनील पांडेय, स्टेट बँकेचे नवीन उप्पलवार, अग्रणी



बँक जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यावेळी उपस्थित होते. या उपक्रमामुळे खातेदारांना त्यांच्या हक्काच्या ठेवी परत मिळवण्याची संधी मिळत आहे. १० वर्षांहून अधिक काळ ज्या ठेवींवर दावा केलेला नाही, अशा ठेवी 'ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधी'मध्ये हस्तांतरित करण्यात येतात. खातेदारांना त्या परत मिळवण्याचा पूर्ण अधिकार आहे. याबाबत जनजागृती व्हावी यासाठी या शिबिराच्या आयोजन करण्यात आले. शिबिरात खातेदारांच्या दावा न केलेल्या ठेवींचे निराकरण करणे तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासंबंधी मार्गदर्शन शिबिरात करण्यात आले. वित्तीय सेवा विभाग आणि राज्यस्तरीय बँकर्स समिती यांच्या निर्देशानुसार हे शिबिर घेण्यात आले. ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत नामनिर्देशित, लाभार्थी या शिबिरास उपस्थित होते. शिबिराचे प्रास्ताविक सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया क्षेत्रीय प्रबंधक सुनील पांडेय यांनी केले. संचालन नरेश हेडाऊ जिल्हा व्यवस्थापक अग्रणी बँक यांनी तर लीड बँकेचे रोहन पोंक्षे यांनी केले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २५ ऑक्टोंबर २०२५

शहर/ग्रामिण


## माजी राज्यपाल रा. सू. गवई यांचे स्मारक उद्घाटनासाठी सज्ज

### ३० ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती, अमरावतीत उभे राहिले दादासाहेबांचे भव्य स्मारक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

माजी राज्यपाल रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या स्मारकाचे काम गतीने पूर्ण करण्यात आले आहे. दादासाहेबांचा पुतळा, संग्रहालय आणि सभागृहाचे काम पूर्णत्वास आले असून हे भव्य स्मारक उद्घाटनासाठी सज्ज झाले आहे.

दादासाहेब गवई यांच्या स्मारकाचे उद्घाटन आगामी ३० ऑक्टोबर रोजी होणार आहे. उद्घाटनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे हा कार्यक्रम भव्य दिव्य होणार आहे. स्मारक ठिकाणी वीज, पाणी आणि स्वच्छतेची कामे प्राधान्याने करण्यात आली आहेत. याबाबींचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. वीज वितरण सुरळीत सुरू राहावी, पाण्याचा पुरवठा व्यवस्थित राहावा, तसेच स्वच्छतेसाठी मनुष्यबळ नेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केल्या आहे.





दादासाहेब गवई यांचा जीवनपट येथे येणाऱ्या नागरिकांना कळावा, यासाठी चित्रफिती तयार करण्यात आल्या आहे.


नागपूर ते संभाजीनगर नॅशनल हायवे दरम्यान येणाऱ्या

## तळेगाव ते पुलगाव रस्त्याची होणार उद्यापासून दुरुस्ती

### आ.प्रतापदादा अडसड यांच्या प्रयत्नांना यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५धामणगाव-**

मागील अनेक दिवसांपासून खड्डे पडलेल्या पुलगाव ते तळेगाव दशासर येथील रस्त्याची दुरुस्ती लवकरच होणार असून याविषयी आमदार प्रतापदादा अडसड यांनी नॅशनल हायवेचे अमरावती येथील कार्यालयातील एक्झिक्युटिव्ह इंजिनियर यांच्याशी चर्चा केली आणि त्यांनी ताबडतोब यामध्ये लक्ष घालून उद्यापासूनच दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या. आणि तात्काळ काम सुरू करण्याबाबत संबंधितांना निर्देश दिले आहे.



नागपूर ते संभाजीनगर नॅशनल हायवे यामध्ये तळेगाव ते पुलगाव पर्यंत रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली होती व त्यामुळे अपघात सुद्धा घडत होते. त्यासंदर्भात आमदार प्रतापदादा अडसड यांनी नॅशनल हायवे चे अमरावती येथील कार्यालयातील एक्झिक्युटिव्ह इंजिनियर कथलकर यांच्याशी चर्चा केली आणि त्यांनी ताबडतोब यामध्ये लक्ष घालून उद्यापासूनच दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या. आणि तात्काळ काम सुरू करण्याबाबत संबंधितांना निर्देश सुद्धा देण्यात आले. तसेच या रस्त्याचा जालना ते पुलगाव पर्यंतचा डीपीआर केंद्र सरकारकडे विभागाकडून गेलेला आहे त्याची सुद्धा सविस्तर माहिती घेऊन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याची माहिती यावेळी आमदार प्रतापदादा अडसड यांनी दिली.आहे.

## 'हिट ॲण्ड रन'चा चालक अखेर पकडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती** स्थानिक कंवरनगर ते फर्शी स्टॉप मार्गावरील भारतीय स्टेट बँक लगतच्या शनसाईन हॉस्पिटलसमोर २१ ऑक्टोबरच्या दुचाकीस्वार युवतींना बेदरकारपणे चिरडून पसार झालेल्या बोलेरो वाहनचालकास राजापेठ पोलिसांनी वाहनासह ताब्यात घेतले आहे.

रोहित रमेश नंदगवळी (वय २४, रा. लुंबिनी नगर, वडरपुरा, अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या चालकाचे नाव असून, त्याच्याकडून जप्त अपघातातील बोलेरो गाडीचा क्रमांक एमएच ४९ बीडब्ल्यू ५९८५ हा आहे.पायल राजेंद्र बुंदेले व तिची मैत्रीण वैष्णवी थोरात या दोघी स्कुटीवरूनकवरनगर चौकाच्या दिशेने जात असताना, सनशाईन हॉस्पिटलसमोर एका चारचाकी वाहनाने मागील बाजूने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दोघीही खाली पडूनजखमी झाल्या, तरीसुद्धा वाहनाने त्यापैकी एकीची अंगावरून वाहन नेऊन तेथून तो चालक वाहनासह पसार झाला होता. या अपघातात वैष्णवी थोरात गंभीर जखमी झाली परिसरातील सीसीटीव्हीमध्ये हा अपघात कैद झाला होता.

या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ५९२/२५ भा.दं. सं. कलम २८१, १२५(अ) अन्वये नोंद करण्यात आला होता. अपघातप्रकरणी राजापेठ पोलिसांनी सलग तीन दिवस अथक प्रयत्न करून २५० हन अधिक सीसीटीव्ही फूटेज तपासले. त्यावरून चालक व वाहनाचा मागोवा घेण्यात यश आले.



वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वाखाली फौजदार मिलिंद हिवरे, अमित बकतवार, हवालदार मनीष करपे, शिपाई पंकज खटे, नायक पोलीस कॉंस्टेबल रवी लीखीतकर, शिपाई सागर भजगवरे, अर्जुन कदम यांनी वाहन शोधण्यात महत्त्वपूर्ण भूमिका वठविली. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त परि-१ गणेश शिंदे, उपायुक्त परि-२ श्याम घुगे व सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## महागाईच्या झटक्यात इंग्लिश दारूची विक्री घटली, देशी दारूला वाढती पसंती

### सहा महिन्यात विक्रीत २.५४ टक्क्यांनी वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

राज्यातील दारूच्या बाजारपेठेत गेल्या सहा



महिन्यांत मोठे चित्र बदलले आहे. विदेशी दारूच्या किंमतीत झालेल्या वाढीचा थेट परिणाम ग्राहकांच्या पसंतीवर झाला असून, आता लोक 'इंग्लिश'ऐवजी देशी दारू पिण्याकडे अधिक वळले आहेत. राज्यात देशी दारूच्या विक्रीत तब्बल ८ टक्क्यांची वाढ, तर अमरावती विभागात २.५४ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. उलट विदेशी दारूच्या विक्रीत २.५२ टक्क्यांची घट झाली आहे.

#### अमरावती विभागातील विक्रीचा आढावा

राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल ते सप्टेंबर २०२५ या सहा महिन्यांत अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये २.७२ कोटी बल्क लिटर देशी दारू विकली गेली. मागील वर्षी याच कालावधीत विक्री २.६५ कोटी बल्क लिटर विक्री होती. म्हणजेच सुमारे ६.७४ लाख लिटरने वाढ झाली. त्याउलट विदेशी दारूची विक्री ८५.३० लाख लिटरवरून घटून ८३.१५ लाख लिटर आहे.

#### महागाईमुळे देशीकडे कल

गेल्या काही महिन्यांत विदेशी दारूच्या विविध ब्रँड्सच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळेनियमितपणे 'इंग्लिश' दारूचे सेवन करणाऱ्यांसाठी रोजचा खर्च वाढला आहे. त्याच्या तुलनेत देशी दारू स्वस्त व सहज उपलब्ध असल्याने अनेकांनी कमी पैशात जास्त नशा या तत्त्वावर देशी दारूकडे वळण्याचा निर्णय घेतला आहे.

## भाऊबीज निमित्त आमदार रवी राणा यांची महिलांसाठी प्रेरणादायी भेट

### ई-रिक्षा वाटपातून आत्मनिर्भरतेचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

भाऊ बीजच्या शुभ पर्वानिमित्त आमदार रवी राणा यांनी आपल्या मतदारसंघातील महिलांसाठी एक प्रेरणादायी उपक्रम राबवला. उत्तमसरा येथे आयोजित विशेष कार्यक्रमात आमदार रवी राणा यांनी चंचल शिंदे या लाडक्या बहिणीला ई-रिक्षा भेट देत भाऊबीज साजरी केली. या प्रसंगी आमदार रवी राणा यांनी स्वतः ई-रिक्षा चालवून महिलांना आत्मनिर्भर तेचा संदेश दिला. त्यांनी सांगितले की, बडनेरा मतदार संघातील गोरगरीब व गरजू महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, त्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम पुढेही राबवले जातील. भाऊबीजच्या निमित्ताने त्यांनी सर्व बहिणींना शुभेच्छा देत महिलांनी रोजगाराच्या माध्यमातून सक्षम व्हावे, असे आवाहन केले. या उपक्रमाचे उपस्थित नागरिक आणि महिलांनी कौतुक करत भाऊबीज सणाचा आनंद आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश अनुभवला.






## राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयातर्फे शासकीय सेवेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५तिवसा-** श्री. राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयातर्फे शासकीय सेवेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार आमदार मा. श्री. राजेशजी वानखडे यांच्या हस्ते संपन्न झाला. मागील १४ वर्षांपासून सुरु असलेल्या या विनाअनुदानित वाचनालयातून आतापर्यंत ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी शासकीय सेवेत यशस्वीरीत्या प्रवेश केला आहे.

या यशाचा गौरव करण्यासाठी नुकतेच नियुक्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. सत्कारित विद्यार्थ्यांमध्ये अक्षय देशमुख, शुभम वानखडे, नकुल कुन्हाडे, आकाश नान्हे, आकाश भलावी व अंकुश केवदे यांचा समावेश होता. तसेच बी. द. चेंज फाऊंडेशन तर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झालेले श्री. विनोद पटेल यांचा आ.राजेश वानखडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी आमदार राजेश वानखडे यांनी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, शाहू महाराज वाचनालय ही तिवसातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी संस्था असून, वाचनालयाच्या उभारणीसाठी मी रु. ८० लाखांचा भक्कम निधी उपलब्ध करून दिला आहे. हे



वाचनालय आता पूर्णपणे डिजिटल स्वरूपात विकसित करून विद्यार्थ्यांना अधिकाधिक सुविधा पुरविण्याचा आमचा प्रयत्न असेल.यानंतर सौ. आरतीताई राजेश वानखडे यांच्या हस्ते वाचनालयाच्या नवीन इमारतीसाठी मिळालेल्या जागेवर वृक्षारोपण करून हरिततेचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी वाचनालयातर्फे आमदार राजेश वानखडे यांचे मन:पूर्वक आभार मानण्यात आले.या प्रसंगी सौ. आरतीताई राजेश वानखडे, नितीनजी गुडढे, प्रवीणभाऊ अडसपुरे, प्रदीपभाऊ गौरखेडे, अनिलभाऊ थुल, सौ. छायाताई दंडाळे, अण्णाभाऊ पडोळे, अजयभाऊ गुल्हाने, ज्ञानेश्वरभाऊ कुऱ्हाडे, मधुकरराव पिंगळे, सतीश नंदनवार, संजयभाऊ वाट, सुनीलभाऊ कुऱ्हाडे, सुनीलभाऊ देशमुख, सुमित अनासाने, मंगेभाऊ जगताप, पप्पूभाऊ देशमुख, अंकुश देशमुख, आकाश बावरी, रोशन राठी, भूषण मुंदाणे, सुरज भगत, मयूर गंधे, सुरज कपले, दीपक धानोरकर, सौरभ इंगळे, स्वप्नील कुऱ्हेकर, राहुल धडांगे तसेच वाचकवर्ग आणि गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय गडलिंग यांनी तर आभार प्रदर्शन भूषण मुंदाणे यांनी केले.

## सर्वधर्मीय भाऊबीज सोहळ्यात दिला सामाजिक सलोखा

### एकतेचा परिचय, सोहळ्यात ५०० लाडक्या बहिणींची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५वलगाव** - वलगाव येथे भाऊ-बहिणींच्या डोळ्यांच्या कडा पाणावणारा सर्वधर्मीय धर्मगुरूंच्या साक्षीने सामाजिक सलोखा वाढवणारा सर्वधर्मीय भाऊबीज सोहळा थाटात पार पडला. या वेळी ५०० लाडक्या बहिणींची उपस्थिती होती. सामाजिक सलोखा व एकतेचा अनोखा संगम पाहायला मिळाला. सिकची रिसॉर्ट येथे झालेल्या सोहळ्याचे आयोजन जि. प. माजी सदस्य प्रकाश साबळे यांच्या संकल्पनेतून आणि प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने साजरा करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आचार्य ॲड. सागर महाराज देशमुख, ग्रामगीताचार्य पौर्णिमा सवाई, रसायन शास्त्रज्ञ ऑस्ट्रेलिया पवित्रा गडलिंगे, प्रेमकिशोर सिकची, प्रभा सिकची, थायलंड येथील भंते सिवली अभ्यासारो, शीख धर्मगुरू अमरज्योत सिंग, फादर जोस, डॉ. दिलीप काळे, प्रकाश साबळे, सचिन मालकर, सरपंच नूतन काळे, माजी सरपंच चंदन दिवाण, सुनंदा सोनोणे, सूर्यकांता बावणे, मीना कडू आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मंजूळ स्वरात परमेश्वराच्या आळवणीने झाली. गावागावातील सामाजिक आरोग्य अबाधित ठेवणाऱ्या १७ गावांतील महिला भजनी मंडळातील भगिनी, उमेद अंतर्गत कार्यरत गट प्रवर्तक भगिनी तसेच बुद्ध वंदना म्हणणाऱ्या महिला भगिनींनी सर्व धर्मगुरूंच्या आशीर्वादाने भावांचे औक्षण करून भाऊबीज साजरी केली. या वेळी वारकरी संप्रदायातील रघुनाथ ठाकरे, भाऊराव राऊत, मनोहर चोपडे, गिरधर मेश्राम, अजाब अवजारे



या ज्येष्ठ वारकऱ्यांचा सन्मान ज्योतिषचार्य आचार्य ॲड. सागर महाराज देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी सर्व भाऊरायांनी भगिनींना माहेरची साडी प्रदान करून स्नेहाचा बंध अधिक दृढ केला. जातीय तेढ मिटवणारी आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देणारी सर्वधर्मीय भाऊबीज ही खऱ्या अर्थाने राष्ट्रप्रेमाचे प्रतीक असल्याचे मत भंते सिवली अभ्यासारो यांनी व्यक्त केले.


सूत्रसंचालन नांदुरकर यांनी केले, तर आभार सीमा पाखरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी नीलेश उभाड, अनुला खान, राहुल तायडे, प्रा. सुनील सावळे, नितीन पवित्रकार, गणेश कडू, सागर महल्ले, विवेक पाथरे, सचिन महले, ज्ञानेश्वर काळे, अमर इंगळे, मिलिंद वंजारी, अक्षय सरोदे, किरण महल्ले, सागर ठाकरे, प्रशांत विघे, सुधीर पडोळे, सौरभ कोहळे,आकाश गडपाल, अजहर अहमद, आशिष खोडे, तुषार भोकरे, जयंत दाभाडे आदींनी सहकार्य केले. सागर महाराज देशमुख यांनी मार्गदर्शन करताना म्हटले, की जगात श्रेष्ठ आई आहे. आई म्हणजे स्त्री. तिची सुरक्षा आणि सन्मान हेच मानवतेचे खरे भाऊबीज आहे. तसेच प्रकाश साबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. गावखेड्यातील अडचणीत असलेल्या माय-माऊली बहिणींना रोजगारक्षम व स्वावलंबी बनवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# श्री क्षेत्र वरखेड येथे श्री संत आडकुजी महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव

## २९ ऑक्टोंबर रोजी तीर्थ स्थापना, ५ नोव्हेंबर रोजी काला महाप्रसाद

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५वरखेड** परमहंस श्री सद्गुरू आळकुजी महाराज यांचा १०४ वा पुण्यतिथी महोत्सव अर्थात प्रार्थना दिन उत्सव दी २९ ऑक्टोंबर ते ५ नोव्हेंबर २०२५ रोजी पर्यंत विविध सामाजिक, रचनात्मक व धार्मिक कार्यक्रमाने.होत असून या सप्ताहात दररोज प्रभाती काकडा आरती, सामुदायिक ध्यान, चिंतन, रामधून, ग्रामगीता प्रवचन, दैनिक अन्नदान, सामुदायिक प्रार्थना व भाषण, पंचपदीं, हरिपाठ, खंजेरी भजन,किर्तन होणार आहे.

बुधवार दिनांक २९ ऑक्टोंबर रोजी प्रभाती श्री चे महासमाधीस महाभिषेक व तीर्थ स्थापना सुरज विनायकराव बोके वरखेड यांचे हस्ते. याप्रसंगी श्री संत सयाजी महाराज व श्री संत सचिन देव महाराज यांची प्रमुख उपस्थितीत व अखंड वीणा पाहरा -अशोक रंगारी, साहेबराव भोजने प्रकाश फाले साय काळी रात्री रात्र कोणसामुदायिक प्रार्थना व भाषण मुकुंद पुंनसे रात्री भजन सध्या आदर्श भजन मंडळ शेंदोळा खुर्द ३० ऑक्टोंबर रोजी दैनंदिन कार्यक्रम सकाळी ९ वाजता ग्रामगीता प्रवचन रवींद्र कांडलकर सायंकाळी सामुदायिक प्रार्थना व भाषण सचिन जगताप अमरावती यांचखंजेरी भजन श्री संत शंकर महाराज भजन मंडळ पिंपळखुटा ३१ ऑक्टोबर सामुदायिक ध्यान चिंतन डॉ रोशन प्र बोके १०ते ३ आरोग्य तपासणी शिबिर उपजिल्हा रुग्णालय तिवसा रात्री भक्ती संगीत श्री संत लाहानुजी महाराज दरबार टाकरखेडा प्रमुख जनार्धन डोईजड संच गायक अरुण राऊत दि २ नोव्हेंबर रोजी सामुदायिक ध्यान व चिंतन सौ वंदना हरणे दु २ ते ५ महिला मेळावा कार्यक्रम सूत्रसंचालन संचालक श्रीमती शोभाताई देशमुख प्रमुख अतिथी व निमंत्रित महिला डॉक्टर स्वाती पडोळे नयना बोके द्वारकाबाई गोहत्रे , गुंफा बाई आगर ,कल्पना दिवे ,रोशनी पूणसे ,राखी राऊत, ललिता बोराळकर, दीपाली कावल कर मालू बोकडे, संगीता बेलूरकर ,वनीता मेश्राम रंजना बोके, माला बोकेसुहासिनी बोके, संध्या बोके व सर्व ग्रामस्थ महिला वरखेड तारखेडमाहेर वाशिनी मुलींचा सत्कार विश्वस्त सौ अनुराधा अं बोके यांचे हस्ते रात्रौ किर्तन विनोदाचार्य ह भ प नारायण




महाराज पडोळे निंभी ३ नोव्हेंबर रोजी महिला आरोग्य तपासणी शिबीर ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार ४ नोव्हेंबर रोजी राजकुमार बोके यांचे ग्रामगीता प्रवचन, ५ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पालखीचे तसेच संत लहानुजी महाराज श्री संत सत्यदेव महाराज यांचे पालखीचे आगमन व भव्य स्वागत महा द्वारावर पालखीचे पूजन व स्वागत अध्यक्ष अभिजित बोके सचिव मनोहर बोके व विश्वस्त मंडळ वरखेड यांचे हस्ते ७ वाजता सामुदायिक प्रार्थना व भाषण लक्ष्मणराव गमे सर्वाधिकारी गुरूकुंज आश्रम , ९ वाजता भारुड गणेशजी महाराज शिंदे यांचे . बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर कार्तिक पौर्णिमा. रोजी काला व महाप्रसाद प्रभाती श्री च्या महा समाधीची महापूजा अभिजीत महेंद्र बोके अध्यक्ष आडकुजी महाराज संस्थान वरखेड यांच्या हस्ते १० ते १२ काला व अभंग वाणी हभप मयूर महाराज येळा केळी साथ संगत किशोर पांडव व संच वारकरी भारसवाडी

प्रासंगिक उदबोधन जनार्दन बोथे सरचिटणीस अभा गुरुकुज, श्री संत सचिन देव महाराज निमंत्रित संत महात्मे तसेच आमंत्रित प्रमुख अतिथी खास बळवंत वानखडे, खा अमर काळे, आम राजेश वानखडे, आं संजय खोडके,आ दादाराव केचे, आम् सुमित वान खडे, माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर, माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू हेमंत भाऊ काळमेघ , रविराज देशमुख आदींची उपस्थिती राहणार काला महाप्रसाद नंतर सामुदायिक प्रार्थना श्रीच्या पालखीची शोभायात्रा भजन सध्या आदी कार्यक्रमाल व राष्ट्रवादीने कार्यक्रमाचे समाप्त होनार आहे संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजयराव बोके अंजनगाव सुर्जी तर संस्थांचे अध्यक्ष अभिजीत बोके यांचे आभार प्रदर्शन करून सप्ताहची समाप्ती होणार आहे.

# सहा लाखांचे दागिने पाच तासात शोधले

## परतवाडा पोलिसांची दमदार कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती–** अमरावतीला नातेवाईकाकडे जाण्यासाठी निघालेल्या व नातेवाईकाच्या वाहनात बसताना तेथेच विसरलेली सहा लाखांच्या दागिन्यांची बॅग अवघ्या पाच तासांत शोधून परतवाडा पोलीस ठाण्याच्या डिबी पथकाने शोधून त्या महिलेला भाऊबिजेची ओवाळणी दिली. ऋषाली हर्षल देशमुख (२७ वर्ष, रा. बिलनपुरा, अचलपूर, असे तक्रारदार महिलेचे नाव आहे. त्या आणि त्यांचे पती २३ ला ७ वाजता अमरावतीला नातेवाइकांकडे जाण्यासाठी चांदूर बाजार नाक्यावर आले होते. यावेळी त्यांनी त्यांच्या अल्टो गाडीतील सामान नातेवाइकांच्या गाडीत ठेवताना, चुकून एक पिशवी त्या तिथेच विसरल्या. त्या पिशवीत २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र (२,५०,००० रुपये), १५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोफ ( १,८५,००० रुपये), आणि ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले (६०,००० रुपये) असे एकूण ४५ ग्रॅम सोन्याचे दागिने होते. त्याची अंदाजे किंमत सहा लाख रुपये होती. दागिन्यांची बॅग हरविल्याची



तक्रार ऋषाली देशमुख यांनी परतवाडा पोलीसठाण्यात नोंदविली. ठाण्याच्या डीबी पथकाने तातडीने कारवाई सुरू केली. पथकाने घटनास्थळी भेट देऊन आजूबाजूच्या परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले. तपासादरम्यान शामला नामक महिलेने ती पिशवी चांदूरबाजार नाक्यावरून घेऊन गेल्याचे दिसून आले. शामला तिच्या मुलांसह संत्रा तोडीसाठी भिलोना येथे गेल्याची माहिती मिळाली. डीबी पथकाने भिलोना येथील शेतशिवारात जाऊन त्या महिलेकडून हरवलेली पिशवी ताब्यात घेतली. पिशवीची तपासणी केली असता, त्यात सर्व सोन्याचे दागिने जसेच्या तसे आढळले. ही पिशवी ऋषाली हर्षल देशमुख यांना परत करण्यात आली. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर भाऊबिजेच्या सणाला आनंद पसरला. त्यांनी पोलिसांचे आभार मानले.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि सहायक पोलीस अधीक्षक (उपविभाग अचलपूर) डॉ. शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक सुरेश म्हस्के (ठाणेदार, परतवाडा), सहायक पोलीस निरीक्षक संजय अत्राम, पोलीस हवालदार सचिन होले, सुधीर राऊत, पोलीस कॉन्स्टेबल विवेक ठाकरे, घनश्याम किरोले, शुभम शर्मा, जितेश बाबील, सचिन कोकणे, विराज ठाकूर आणि पीयूष वानखडे यांनी या कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली.

# कृषी साहित्य विक्रेत्यांचा मंगळवारी राज्यव्यापी बंद

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अमरावती–** साथी ॲप व नव्याने येणाऱ्या पेस्टीसाईड ॲपच्या विरोधात महाराष्ट्र फर्टिलायझर, पेस्टिसाइड आणि सीड डीलर असोसिएशन, पुणे (माफदा) यांनी राज्यव्यापी बंदची हाक दिली आहे. या बंदला अमरावती जिल्हा कृषी साहित्य विक्रेता सेवा संघाने संपूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे. अमरावती जिल्हा कृषी साहित्य विक्रेता सेवा संघातर्फे ॲपच्या विरोधात मंगळवारी (ता. २८) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संघाचे सचिव संजय उंबरकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनानुसार, केंद्र व राज्य शासनाच्या नव्या ॲप धोरणामुळे विक्रेत्यांवर अन्यायकारक बंधने येत असून, व्यवहारात अडचणी निर्माण होत आहेत.या धोरणाच्या निषेधार्थ २८ ऑक्टोबरला अमरावती जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्रे पूर्णतः बंद ठेवण्यात येतील. या दिवशी कोणतीही खते, बियाणे किंवा कीटकनाशके विक्रीसाठी उपलब्ध राहणार नाहीत. आंदोलनाच्या दिवशी संघातर्फे भव्य रक्तदान शिबिर घेण्यात येणार असून त्यातून सामाजिक बांधिलकीतून आंदोलन असा संदेश दिला जाणार आहे. निवेदन देताना अमरावती जिल्हा कृषी साहित्य विक्रेता संघाचे सचिव संजय उंबरकर, उपाध्यक्ष अभिषेक कडू, सहसचिव उमेश सोनोने उपस्थित होते.

# इर्विन रुग्णालयात औषधांचा तुटवडा!

## साध्या गोळ्यांसाठीही रुग्णांची बाहेर धावपळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती** सरकारी आरोग्य सेवांबाबत जनतेच्या तक्रारी काही नतीन नाहीत. डॉक्टर बेलेवा उपलब्ध नसणे, उपचारात हलगर्जीपणा, तसेच आवश्यक सुविधा नसणे या तक्रारी नेहमीच ऐकायला मिळतात. आता जिल्हा सामान्य रुग्णालयातच औषधांचा संपूर्ण साठा संपल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे गरीब रुग्णांना बाहेरून औषधे, ग्लुकोज आणि अन्य आवश्यक साहित्य विकत घ्यावे लागत आहे.

आय ड्रॉप्स आणि सामान्य गोळ्या संपल्या आहेत. जिल्ह्यातून आलेल्या काही रागरिकांनी तक्रार केली की, जिल्हा रुग्णालयात अनेक साध्या गोळ्यासुद्धा संपल्या आहेत.



डोळ्यांच्या रुग्णांसाठी वापरले जाणारे आवश्यक आय इप्पिसहीउपलब्ध नाहीत, डोळ्यांच्या उपचारात सतत आय ड्रॉप्स टाकणे आवश्यक असते, मात्र औषधे उपलब्ध नसल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोठी गैरसोय होत आहे.

### रुग्णांना जेनेरिक शॉप मध्ये जाण्याचा देतात सल्ला !

रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकानी तक्रार केली की, रुणालयातील काउंटरवर गेल्यानंतर औषधे नाहीत, जवळच्या जेनरिक दुकानात जा असा सा कर्मचारी देत आहेत समालयात औषधे उपल नसल्याने रुग्णाना खासगी दुकानातून दुप्पट किमतीड औषधे विकत घ्यावी लागह आहेत. जिल्हा सामान्य रुग्णालय है गरीब आणि सर्वसामान्यांसाठी उपचाराचे २० मुख्य केंद्र आहे. येथेब औषधांचा तुटवडा निर्माण होने ही चिंताजनक बाब अमूर, प्रशासनाने तातडीने साठा उपलब्ध करून रुग्णांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.–

# अचानक पावसाने शेतकऱ्यांचे गणित बिघडवले

## चांदूर रेल्वे कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनचे पोते भिजले; शेतकरी व व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५चांदूर रेल्वे** शुक्रवारी संध्याकाळी अचानक हवामान बदलला. जोरदार वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने चांदूर रेल्वे कृषी उत्पन्न बाजार समितीत एकच गोंधळ उडाला.

खुल्या मैदानात ठेवलेले हजारो क्विंटल सोयाबीनचे पोते पावसात भिजल्याने शेतकरी आणि व्यापाऱ्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागला.



दररोज स्थानिक बाजार समितीत सुमारे १,००० ते १,२०० पोत्यांची सोयाबीनची आवक होत असते. मात्र, शुक्रवारी सायंकाळी अचानक ढग दाटले आणि पाऊस सुरू झाला. शेतकरी, मजूर आणि बाजार समितीतील कर्मचारी शेतीमाल वाचवण्यासाठी ताडपत्री टाकण्यासाठी धावपळ करू लागले; पण तोपर्यंत अनेक पोते पूर्णपणे भिजले होते.

शेतकऱ्यांनी सांगितले की, बाजार समितीतील शेड व्यापाऱ्यांच्या ताब्यात असल्याने त्यांना आपला माल खुल्या जागेत ठेवावा लागतो. त्यामुळे अचानक आलेल्या पावसामुळे मोठे नुकसान झाले. अनेक व्यापाऱ्यांचे वजन केलेले पोतेही ओले झाल्याने त्यांनाही फटका बसला आहे. यात व्यापारी वर्गाचे मोठे नुकसान झाल्याचे समजते.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव चेतन इंगळे यांनी सांगितले की, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बाजार समितीतील आवक वाढली होती.

सकाळीच शेतकऱ्यांना माल सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची सूचना देण्यात आली होती. मात्र, घाईगडबडीत काहींनी शेतमाल खुल्या जागेत ठेवला. अचानक आलेल्या पावसामुळे नुकसानीची स्थिती निर्माण होते. इंगळे यांनी पुढे सांगितले की, आज शनिवार, २५ ऑक्टोबर रोजी बाजार समितीत कोणत्याही प्रकारची आवक बोलावली जाणार नाही, कारण हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात अजूनही पावसाची शक्यता आहे.

# जिल्हा कुस्ती संघातर्फे ॲड. प्रशांत देशपांडे यांचा सत्कार

## राज्य ऑलिम्पिक संघटनेच्या उपाध्यक्षपदी अविरोध निवड


**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२५अमरावती–** अमरावती शहरातील विधिज्ञ ॲड. प्रशांत देशपांडे यांची महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अमरावती शहर जिल्हा कुस्ती संघाच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. त्यांची ही निवड म्हणजे अमरावतीच्या क्रीडा तसेच विधी क्षेत्रासाठी अभिमानास्पद बाब असल्याच्या प्रतिक्रिया पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या. या प्रसंगी अमरावती शहर जिल्हा कुस्ती संघाचे पदाधिकारी डॉ. संजय तीरथकर, प्राचार्य राजेश जयपूरकर, भास्कर टोम्पे, माजी नगरसेवक मनीष जोशी, डॉ. विजय टोम्पे, दिलीप इटणकर आणि प्रशांत




अडसड उपस्थित होते. ॲड. देशपांडे हे अमरावतीच्या क्रीडा, राजकारण व कला क्षेत्रातील परिचित नाव आहे. महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांचे काम उत्तम राहिले आहे. ते भाजपचे निमंत्रित सदस्य असून अखिल भारतीय नाट्य परिषद मुंबईच्या नियामक मंडळाचेही ते सदस्य आहेत. एक बहुगुणी व्यक्तिमत्व म्हणून ते सर्वपरिचित आहेत. त्यांच्याकडून विविध क्षेत्रात विकासात्मक, यशस्वी कामगिरी व्हावी, यासाठी अमरावती शहर जिल्हा कुस्ती संघातर्फे ॲड. प्रशांत देशपांडे यांना शुभेच्छा देण्यात आल्या. ॲड. देशपांडे यांचे अभिनंदन करताना शहर जिल्हा कुस्ती संघाचे डॉ. संजय तीरथकर प्राचार्य राजेश जयपूरकर, भास्कर टोम्पे, मनीष जोशी, दिलीप इटणकर.

# प्रा. संजय घरडे यांच्या 'अल्क़ाब' मराठी ग़ज़ल संग्रहास राज्यस्तरीय शब्दांगण साहित्य पुरस्कार-२०२५ जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती** सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक चळवळीतील कार्यकर्ते, जेष्ठ आंबेडकरी साहित्यिक, साधना रेडीओ ९०.४ एफ.एम. चे केंद्र समन्वयक प्रा. संजय घरडे यांचा 'अल्क़ाब' मराठी ग़ज़ल संग्रह. आंबेडकरी ग़ज़लेचा नवीन आकृतीबंध, नव्या जीवनजाणीवा, आणि वाययीन दृष्ट्या अभ्यासनीय असा हा अतिशय उत्कृष्ठ ग़ज़ल संग्रह विलास थोरात यांच्या गाथा प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. या संग्रहास मराठी साहित्यातील ख्यातनाम विचारवंत प्राचार्य डॉ. रमेश अंधारे सरांची प्रस्तावना लाभली असून. प्राचार्य मनिष चोपडे यांचे आकर्षक मुखपृष्ठ असलेल्या या 'अल्क़ाब' ग़ज़ल संग्रहावर अल्पावधीतच अनेक मान्यवरांनी समीक्षात्मक लेखण केले आहे. 'अल्क़ाब' हे घरडे यांचे दुसरे साहित्यिक अपत्य असून 'अल्क़ाब' मराठी ग़ज़ल संग्रहाला शब्दांगण बहुउद्देशीय ज्ञानप्रबोधिनी चंद्रपूर यांच्या तर्फे देण्यात येणारा राज्यस्तरीय शब्दांगण साहित्य पुरस्कार-२०२५ जाहीर झाला आहे. हा पुरस्कार त्यांना लवकरच प्रदान करण्यात येणार असून स्मुतीचीन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यापूर्वीही प्रा. संजय घरडे यांचा 'नीलपंख' हा कविता संग्रह प्रकाशित झाला असून या संग्रहास सुध्दा अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. तसेच या संग्रहातील कवितांचा समावेश संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बी. कॉम. तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. तसेच यापूर्वी त्यांच्या 'अल्क़ाब' या मराठी ग़ज़ल संग्रहास 'ज्ञानज्योत फाउंडेशन महाराष्ट्र राज्य, पुणे आणि संत गाडगे महाराज विचारमंच महाराष्ट्र राज्य ओतूर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात



येणारा डॉ बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ठ ग़ज़ल राज्यस्तरीय पुरस्कार २०२५, तसेच 'मानव विकास बहु सामजिक संस्था, डोणगाव ता. मेहकर जि. बुलढाणा यांच्यातर्फे देण्यात येणारा दिवंगत – तुकाराम




सखाराम मोरे स्मृती राज्यस्तरीय काव्य गौरव पुरस्कार – २०२५ प्राप्त झाले असून आता नव्याने 'अल्क़ाब' मराठी ग़ज़ल संग्रहास जाहीर झालेल्या 'शब्दांगण बहुउद्देशीय ज्ञानप्रबोधिनी चंद्रपूर यांच्या तर्फे देण्यात येणारा राज्यस्तरीय शब्दांगण साहित्य पुरस्कार-२०२५ प्राप्त झाल्याने या पुरस्काराबद्दल प्रा. संजय घरडे यांचे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. संतोष बनसोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक प्रा. डॉ. रात्नशील खोब्रागडे, प्रा. डॉ. वामन गवई, प्रा. डॉ. भीमराव वाघमारे, प्रा. डॉ. पवन तायडे, प्रा. सुरेश पवार, प्रा. अक्षय गुजर, प्रा. असीत गुजर, प्रा. मुरकुरे, यांचेसह प्राचार्य डॉ. रमेश अंधारे, प्राचार्य डॉ कमलाकर पायस, प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर, प्रा डॉ. वसंत शेंडे, प्रा. डॉ. रवींद्र मुंद्रे, प्रा. डॉ. जलदा ढोके, प्रा डॉ कुंदन शहारे, प्राचार्य प्रसेनजित तेलंग, कवी लोकनाथ यशवंत, प्रमोद वाळके 'युगंधर', प्रा. दीपाली गवई, प्रा. डॉ. मनोहर नाईक, प्रवीण कांबळे (नागपूर) प्रा. संजय शेंडे, प्रा. अशोक थोरात, धर्मशील गेडाम, मायाताई वासनिक गेडाम, विलास थोरात, दिगंबर झाडे, संजय मोखडे, सुदामजी सोनुले, सिध्दार्थ गेडाम, गणेश थोरात, नारायण थोरात, डॉ. नंदकिशोर दामोदरे, देवीलाल रौराळे, स्नेहल सोनटक्के, निर्मल काळबांडे, कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर चे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. के.पी. सिंह, संतोष देशमुख, सचिन पिंजरकर, सुरेश वैध, सिध्दार्थ गडलींग, मायादेवी चंदनकर, धम्मप्रिय चंदनकर, भाग्यश्री खोब्रागडे, भारती डोंगरे, डॉ. रवीन्द्र डोंगरे, जयश्री घरडे, दीपंकर डोंगरे, नीलपंख घरडे यांचेसह आंबेडकरी चळवळीतील अनेक सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, अभ्यासक तथा साहित्यिकांसह आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# दहावी,बारावी परीक्षा शुल्कात वाढ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

फेब्रुवारी-मार्च २०२६ मधील दहावी व बारावीच्या परीक्षेसाठी शुल्कात वाढ केल्याने याचा फटका पालक, विद्यार्थ्यांना बसणार आहे.

जिल्ह्यात दहावीला जवळपास ४० हजार आणि बारावीत जवळपास ४० हजार विद्यार्थी परीक्षेला बसतात. यंदाही आहे. परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी विद्यार्थी अभ्यासालाही लागले आहेत. फेब्रुवारी-मार्च महिन्यांत परीक्षांना सुरुवात होणार आहे. परीक्षेसाठी आवेदनपत्र भरणे सुरू आहे. मात्र, परीक्षा शुल्कासह इतर शुल्कात वाढ करण्यात आली आहे. अगोदरच अतिवृष्टीने पिके नष्ट झाली आहेत. त्यात महागाईने नागरिक त्रस्त असताना विविध शुल्कात वाढ केल्याने विद्यार्थी पालकांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.

राज्य शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या आगामी परीक्षांसाठीच्या शुल्कात निर्णय घेतला आहे. त्यानुसार दहावीच्या नियमित विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क ४७० रुपयांवरून थेट ५२० रुपये तसेच बारावीसाठी शुल्क ४९० रुपयांवरून वाढवून ५४० रुपये एवढे करण्यात आले आहे. सामान्य विद्यार्थ्यांना त्याचा फटका बसेल.

### अतिरिक्त शुल्कांचीही भर

| | |
|---|---|
| प्रशासकीय शुल्क | २० |
| गुणपत्रिका शुल्क | २० |
| प्रमाणपत्र शुल्क | २० |
| प्रात्यक्षिक परीक्षा (प्रति विषय) | ३० |
| एमसीव्हीसी प्रात्यक्षिक परीक्षा (प्रति विषय) | ३० |
| माहिती तंत्रज्ञान विषय शुल्क (प्रति विषय) | ३० |

# 'लालपरी'च्या ॲपचा बोजवारा! लाखो रुपयांचा खर्च वाया

## ॲप सतत बंद, वेळापत्रक चुकीचे, बुकिंग अडचणींमुळे प्रवाशांचा संताप




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

एसटी महामंडळाने प्रवाशांच्या सोयीसाठी 'आपली एसटी' हे मोबाइल ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून प्रवाशांलना बसचे लाइव्ह लोकेशन, जवळचे बसस्थानक, वेळापत्रक, सेवा क्रमांक, तिकीट आरक्षण आदी सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध होईल, अशी संकल्पना होती. दसऱ्याच्या मुहूर्तावर या ॲपचे लोकार्पण केले. प्रत्यक्षात मात्र या ॲपचा उपयोग अत्यंत मर्यादित प्रमाणात होत असल्याचे चित्र आहे. विशेषतः एसटीने प्रवास करणाऱ्या लाखो सामान्य प्रवाशांना या ॲपचा फारसा उपयोग होत नसल्याने प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या ॲपमध्ये बसचे थेट लोकेशन बघण्याची सुविधा केवळ आरक्षित तिकीटधारकांनाच दिली जाते. यामुळे जो प्रवासी आगाऊ आरक्षण करतो, त्यालाच त्याच्या बसचा क्रमांकटाकल्यावर तिचे लोकेशन दिसते. मात्र, एसटीच्या प्रवाशांपैकी फक्त दीड ते दोन टक्के प्रवासी आरक्षण करतात. उर्वरित ९८ टक्के प्रवासी हे सरळ स्थानकावर जाऊन तिकीट काढतात. त्यामुळे बसच्या थेट लोकेशनसारखी महत्त्वाची सेवा. सर्वसामान्य प्रवाशांना मिळत नाही.

### खोळंब्याने डोकेदुखी

'आपली एसटी' ॲप वापरकर्त्यांकडून सातत्याने तक्रारी येत आहेत. काही बस स्थानकावर पोहोचल्यानंतरही ॲपवर त्यांचे लोकेशन अपडेट होत नाही. काही वेळेस ॲप क्रॅश होते. माहिती लवकर मिळत नाही, तर बस क्रमांक शोधण्यासाठीही ॲपमध्ये सुलभ पर्याय नाही. तक्रार देण्यासाठी स्वतंत्र पर्याय नसल्याने त्रास झाल्यावर प्रवाशांना समाधानकारक मार्ग सापडत नाही. टाकल्यावर तिचे लोकेशन दिसते. मात्र, एसटीच्या प्रवाशांपैकी फक्त दीड ते दोन टक्के प्रवासी आरक्षण करतात. उर्वरित ९८ टक्के प्रवासी हे सरळ स्थानकावर जाऊन तिकीट काढतात. त्यामुळे बसच्या थेट लोकेशनसारखी महत्त्वाची सेवा सर्वसामान्य प्रवाशांना मिळत नाही.

### सात वर्षे झाली ॲप अर्धवटच

वर्ष २०१८-१९मध्ये एसटी महामंडळाने एका खासगी कंपनीला व्हेइकल ट्रॅकिंग सिस्टिम बसवण्याचे कंत्राट दिले.यासाठी ३२ कोटी ५५ लाख रुपयांची आर्थिक तरतूद केली. आतापर्यंत यापैकी १३ कोटी ३२ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला असून काही बसेसमध्ये व्हेइकल ट्रॅकिंग सिस्टिम आणि काही प्रमुख स्थानकांवर पॅसेंजर इन्फॉर्मेशन सिस्टिम स्क्रीन बसवण्यात आल्या आहेत. या प्रणालीवर आधारित ॲप सुरू होण्यासाठी सात वर्षे लागली. तरीही ते अद्याप अर्धवट व अपूर्णच असल्याचे चित्र आहे.

# सातरगाव येथे इंद्रपुरी महाराजांचा भव्य पालखी सोहळा उत्साहात संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

तिवसा तालुक्यातील सातरगाव येथे दिनांक २४ ऑक्टोबर रोजी इंद्रपुरी महाराज देवस्थान येथे पारंपरिक इंद्रपुरी महाराजांचा पालखी सोहळा मोठ्या भक्तिभावाने आणि थाटामाटात संपन्न झाला. गेल्या तब्बल ५० वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या सोहळ्याने सातरगाव परिसरातील भक्तांना श्रद्धेचे एकत्रीकरणाचे केंद्र निर्माण केले आहे.

सातरगाव ते करजगावच्या मध्यभागी वसलेले इंद्रपुरी महाराजांचे हे पवित्र स्थळ दरवर्षी भाविकांसाठी आस्था आणि भक्तीचा केंद्रबिंदू ठरते. विश्वस्त मंडळाच्या पुढाकाराने दरवर्षीप्रमाणे यंदाही पालखी सोहळा, कीर्तन, भजन व गोपालकाल्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

यावेळी इंद्रपुरी महाराजांची पालखी सातरगावच्या सर्व मुख्य रस्त्यांवरून भव्य मिरवणुकीच्या रूपात काढण्यात आली. जयजयकारांच्या घोषात आणि टाळ-मृदुंगांच्या नादात भक्तांनी महाराजांच्या पालखीचे स्वागत केले. दुसऱ्या दिवशी पारंपरिक पद्धतीने गोपालकाल्याचा कार्यक्रम संपन्न झाला.या सोहळ्यात इंद्रपुरी महिला भजन मंडळ सातरगाव, गुरुमाऊली महिला भजन मंडळ सातरगाव आणि श्री गणेश मंडळ यांनी सुमधुर भजने सादर करून वातावरण भक्तिमय केले.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विश्वस्त वासुदेवराव राऊतकर, गुणवंतराव वनवे, उमेशराव तिवसकर, मिलिंदराव वाघ, डॉ. उमेश वनवे, जानरावजी लुटे, वासुदेवराव दंडाळे, मारोतराव बांते, भगवानराव लांजेवार, महादेवराव किटुकले, पांडुरंगराव दंडाळे, साहेबराव कांबळी, सरपंच राजेश खाकसे तसेच तरुण कार्यकर्त्यांनी केले.महिला भजन मंडळातील छायाताई दंडाळे, आरती वाघ, निर्मलाताई लांजेवार, शालू इजापुरे, कांता पाटेकर, वर्षा गोलाईत, वंदना इजापुरे, वंदना वनवे, आशा शेकार, जयश्री पाटेकर, अस्मिता खैरकार, सीमा गावणार, माला दंडाळे, संध्या कांदे, विद्या कांदे, रोशनी कांदे, साक्षी कांदे, गीता धवने, पल्लवी इजापुरे, मंजू गांजरे, नंदा कानबाले, ज्योती लांजेवार, रेखा धानोरकर, लता ठोंबरे, कोकिळा टेकाडे, जयश्री आतकरी, वर्षा मते, छाया लांगळे, प्रिती कडुकर, सुनंदा वनवे, भारती वाघ, कमल लुटे, रंजना कामडी, हर्षा खैरकार, नंदा कामडी, विमल कामडी यांच्यासह गावातील महिला, भक्तवर्ग आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाऊबीज भेट सोडा, मानधनही मिळाले नाही

### अंगणवाडी कर्मचाऱ्यांची दिवाळी गेली अंधारात घोषणांचा सुकाळ, अंमलबजावणीचा दुष्काळच



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५चांदुर बाजार/मोर्शी**

राज्य शासनाने दिवाळीच्या तोंडावर अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने दोन हजार रुपयांची 'भाऊबीज भेट' देण्याची घोषणा केली होती. ही रक्कम दिवाळीपूर्वी जमा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु दिवाळी आटोपली अन् भाऊबीजही, मात्र रक्कम अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा झाली नाही. इतकेच काय तर मानधनही मिळाले नसल्याने कर्मचाऱ्यांची दिवाळी अंधारातच गेल्याचे सांगण्यात आले.

महिला व बालविकास विभागामार्फत एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत कार्यरत असणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस गावपातळी प्रभावीपणे कार्य करीत आहे. लहान मुले, गर्भवती महिला आणि स्तनदा माता यांच्यासाठी आरोग्य, पोषण आणि पूर्व-प्राथमिक शिक्षणाशी संबंधित सेवा देत आहे. लहान मुलांना आरोग्य तपासणी व लसीकरण, पूरक पोषण आहार देणे, महिलांना आरोग्य, कुटुंब नियोजन आणि आरोग्याबाबत शिक्षण देणे तसेच पोषण ट्रॅकरसारख्या योजनांची अंमलबजावणी करणे यांसारख्या कामांची जबाबदारी त्यांच्यावर आहे. पण, बऱ्याचदा त्यांना मानधन आणि इतर अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे यावर्षी त्यांची दिवाळी गोड व्हावी, या उद्देशाने शासनाने दिवाळीपूर्वी दोन हजार रुपयांची भाऊबीज भेट देण्याची घोषणा केली होती. त्यामुळे अंगणवाडी सेविका आणि मतदनिसांमध्ये आनंद संचारला होता. परंतु आता भाऊबीज आटोपली तरीही भेटीचे दोन हजार रुपये आले नसल्याने शासनाने भ्रमनिराश केल्याची भावना व्यक्त केली. नेहमीच घोषणांचा सुकाळ असतो पण, अंमलबजावणीत दुष्काळ राहत असल्याचे पुन्हा दिसून आले आहे.

**प्रवास भत्ता, पोषण भत्त्याचाही पत्ता नाही**

शासनाने दिवाळीपूर्वी मानधन आणि भाऊबीज भेट दिली नाहीच. परंतु जिल्ह्यातील काही प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना गेल्या तीन ते चार वर्षापासून प्रवास भत्ताही दिला नसल्याचेही समोर आले आहे. त्यासोबतच त्यांना पोषण भत्ताही मिळत नसल्याचे सांगण्यात आले. असे असतानाही त्या आपली जबाबदारी निमुटपणे पार पाडत असून त्यांच्याकडे शासनाचे दुर्लक्ष का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट, गाईड प्रशिक्षणात रवींद्र निंघोट सन्मानित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

शिक्षण विभाग प्राथमिक व माध्यमिक, जिल्हा परिषद अमरावती व अमरावती भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट गाईड राज्य कार्यालय मुंबईच्या परवानगीने अमरावती स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय यांच्या शिक्षकांकरिता स्काऊट मास्टर बेसिक व शिक्षिकां करिता गाईड कॅप्टन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षण समारोपाचा कार्यक्रम जिल्हा स्काऊट गाईड कार्यालय अमरावती येथे आयोजित करण्यात आला होता प्रशिक्षण शिबीरामध्ये विविध तालुक्यातील शिक्षक, शिक्षिका सहभागी झाल्या होत्या.आजच्या शिबीर समारोपाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. सतीश मुगल शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद अमरावती हे व्यासपीठावर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणुन श्री. सुभाष आठवले ( जिल्हा संघटक स्काऊट ) श्रीमती प्रिती गोल्हर (जिल्हा गाईड संघटक) श्री. संजय रामावत जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट अमरावती, श्रीमती सुनीता इथापे जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड , शिबीर सहाय्यक श्री. सुरेंद्र सिसट, श्री. संदीप टिक्कस, श्रीमती सुनीता गेही, श्रीमती ज्योती बांबल शिबीर सहाय्यक ह्या व्यासपीठावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरवात लॉर्ड बेडेन पावेल यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. श्री. आठवले यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. मुगल याचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. आठवले यांनी केले. शिबिरामध्ये स्काऊट गाईड अभ्यासक्रम, तासिका नियोजन, राज्य पुरस्कार, विविध उपक्रम, गाठी, प्रथमोपचार अशा विविध विषयांवर तसेच मुलांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक अशा सर्वांगीण विकासाकरिता मार्गदर्शन करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणातून श्री सतीश मुगल यांनी स्काऊट गाईड ही जागतिक दर्जाची चळवळ आहे. यामधून विद्यार्थ्यांचा बौद्धिक, मानसिक विकास होतो. तसेच त्यांना संयम शिस्तीचे महत्वाचे धडे यामधून प्राप्त होते. यामध्ये विद्यालयातील जास्तीत जास्त विध्यार्थी सहभागी व्हावे या बद्दल मार्गदर्शन केले. श्री. रवींद्र निंघोट मुख्याध्यापक जि.प.उच्च प्राथमिक शाळा ब्राह्मणवाडा गोविंदपूर यांनी शिबीराचे महत्व तसेच आदर्श नागरिक घडविण्याचे प्रशिक्षण शिक्षकांना यामधून प्राप्त होते . शालेय स्तरावर आदर्श विध्यार्थी कसा तयार करता येईल हे स्काऊट गाईड शिकविते. याबद्दलचे मत व्यक्त केले. श्री. सुनील साबळे यांनी स्काऊट गाईड चे महत्व तसेच शालेय स्तरावर विध्यार्थी याची संख्यात्मक व गुणात्मक वाढ स्काऊट गाईड करु शकतो. या बद्दलचे मत आपल्या मनोगता तून व्यक्त केले. श्री. विनायकराव निस्ताने ( शिबीर सहाय्यक) यांच्या हस्ते श्री. रवींद्र पांडुरंगजीनिंघोट( मुख्याध्यापक, जि. प. उच्च प्राथमिक शाळा ब्राह्मणवाडा, गोविंदपुर ) यांना स्काऊट मास्टरचे प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रिती गोल्हर यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. सुभाष आठवले यांनी केले.

# मारडा येथील युवकांचा सामाजिक उपक्रम

### दिवाळी निमित्य गुरुकुंज आश्रम येथील वृद्धाश्रमातील वृद्धांना फराळ वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५तिवसा**

अमरावती जिल्ह्यातील मारडा येथील युवकांनी दिवाळी निमित्य गुरुकुंज आश्रम येथील वृद्धाश्रमातील वृद्धांना फराळाचे वाटप करून वृद्धासोबत आनंदात तसेच सामाजिक बांधिलकी जपत दिवाळी साजरी करण्यात आली.मारडा येथील युवकांनी फराळाचे साहित्य वाटपा सोबत त्यांनी वृद्धासोबत हितगुज साधले.त्यामुळे दिवाळीचा आनंद वृद्धांच्या चेहऱ्यावर झळकताना दिसला. या उपक्रमामुळे वृद्धाश्रमात ऐक्य,प्रेम आणि मानवतेचा सुंदर संदेश दिला गेला.ही दिवाळी केवळ आनंदाची नव्हे तर समाजातील सर्वांना सोबत घेऊन साजरी केलेल्या माणुसकीची दिवाळी ठरली.दीपावली च्या पावन पर्वावर दिव्यांच्या उजेडा सोबत मानवी संवेदनाचा प्रकाश झळकला आणि मारडा येथील युवकांनी वृद्धांना दीपावलीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी या उपक्रमामध्ये विनोद जिरापुरे, अमोल आसोले,वैभव साऊतकर,आकाश पाथरे,विशाल बोराले,शिवम गडवाल तसेच अनेक युवक उपस्थित होते.

# उद्या गौड ब्राह्मण सभेचा भव्य अन्नकूट

### गणेश कॉलनीतील ब्रह्मगढ मंदिरात होणार आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

दरवर्षीप्रमाणे यंदाही गौड ब्राह्मण सभेतर्फे स्थानिक गणेश कॉलनीतील गणेश गायत्री मंदिर (ब्रह्मगढ) येथे अन्नकूट महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हे आयोजन उद्या, रविवार २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत पार पडणार आहे.या कार्यक्रमाअंतर्गत प्रथम मंदिरात आरती व पूजन करून भगवानाला छप्पन भोगाचा नैवेद्य अर्पण केला जाईल. त्यानंतर सर्व समाजबंधूंना महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल.ही माहिती देताना गौड ब्राह्मण सभा, गौड ब्राह्मण महिला मंडळ, गौड ब्राह्मण नवयुवक मंडळ व गौड ब्राह्मण नवयुवती मंडळ यांनी सर्व समाजबंधूंना आवाहन केले आहे की उद्या, रविवार २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत गणेश कॉलनीतील गणेश गायत्री मंदिर (ब्रह्मगढ) येथे आयोजित छप्पन भोग दर्शन व अन्नकूट कार्यक्रमात सहपरिवार सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

# ट्रॅव्हलर बसच्या धडकेत एकाचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी

## वलगाव पोलीस ठाण्यापासून थोड्याच अंतरावर घडली धक्कादायक घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५वलगाव**

वलगाव पोलीस स्टेशन पासून थोड्याच अंतरावर असलेल्या कामुंजा फाट्यावर दिनांक तेवीस गुरुवार रोजी दुपारी पाच वाजताच्या सुमारास धक्कादायक घटना घडली आहे रोहन बाबुराव सवाई राहणार नया अकोला जिल्हा अमरावती हा युवक अमरावती वरून त्याच्या एम एच तीस ए जे ३६८७ दुचाकीने येत असताना त्याला नवसारी चौकात शेख बब्बू शेख अब्बास राहणार कामुंजा जिल्हा अमरावती वय साठ वर्ष या इसमाने त्याच्या दुचाकीला हात दाखवला व असे म्हटले की मला कामुंजा फाट्यापर्यंत येऊ द्या दुचाकी चालक युवकाने मानवता धर्माच्या या नात्याने इसमाला आपल्या दुचाकीवर बसवले व दोघेही अमरावती वरून त्याच्या दुचाकीने येत असताना दुचाकी चालक युवक कामुंजा फाट्यावर पोहचताच मागून अमरावती वरून भरधाव वेगात येणारी परतवाडा या दिशेने जाणारी ट्रॅव्हलर बस क्रमांक एम एच तेरा ए एक्स ०७१४ या बसने दुचाकी चालक युवकाला मागून



जोरदार धडक दिली दुचाकीला धडक बसतात युवक व इसम हे दोघेही गंभीर रित्या जखमी झाले असल्यामुळे अमरावती परतवाडा या महामार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना ही घटना लक्षात येताच त्यांनी लगेच दोन्ही जखमी असलेल्या युवक व इसमाला खाजगी वाहनाच्या मदतीने अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले दोघांवरही उपचार चालू असताना मात्र यात इसमाची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे मृतक शेख बब्बू शेख अब्बास वय साठ वर्ष राहणार कामुंजा जिल्हा अमरावती यांचा मृत्यू झाला ही सर्व घटना वलगाव पोलिसांना माहीत पडताच वलगाव पोलिसांनी घटनेच गांभीर्य लक्षात घेताच तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व पंचनामा चालू केला असता ट्रॅव्हलर बस क्रमांक एम एच तेरा ए एक्स ०७१४ या ट्रॅव्हलर बसचा चालक आरोपी रोहित रमेश तळस वय सव्वीस वर्ष राहणार घोराडा तालुका सेलू जिल्हा वर्धा या बस चालक आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्यावर भारतीय न्याय संहिता प्रमाणे कलम २८१.१२५.(-) १२५.(इ) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून आरोपीची ट्रॅव्हलर बस व युवकाची दुचाकी गाडी वलगाव पोलिसांनी ताब्यात घेतली असून दोन्ही वाहने वलगाव पोलीस ठाण्याच्या आवारात लावली असून पुढील तपास वलगाव पोलीस करत आहे.

# ५ दिवस पुन्हा अवकाळी; उत्तर विदर्भ वगळता राज्यभर बरसणार पावसाच्या सरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

अरबी समुद्रात कमी दाबाच्या क्षेत्रामुळे कोकण किनारपट्टीवर शनिवार व रविवार असे दोन दिवस पावसाचा अंदाज असतानाच हवामानातील बदलामुळे काही भागातही पावसाची शक्यता आहे. २८ ऑक्टोबरपर्यंत उत्तर विदर्भ वगळता संपूर्ण महाराष्ट्रात गडगडाटासह मध्यम पाऊस पडेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

ऑक्टोबर हिटचे चटके देणारा सूर्य आग ओकत असल्याने मुंबईत दिवसा घामाने तर रात्री पावसाने आंघोळ होत आहे. शुक्रवारी संध्याकाळी ७ नंतर मुंबईसह लगतच्या परिसरात पडलेल्या जोरदार पावसाने एक तासाहून अधिक मुंबईला झोडपून काढले.




संध्याकाळी साडेसातपूर्वी नवी मुंबईसह लगतच्या परिसरात हजेरी लावलेल्या पावसाने आपला रोख मुंबईकडे वळवला. मेघगर्जनेसह दाखल झालेल्या पावसाने साडेसातनंतर जोर पकडला. फोर्ट, मशीद बंदर, कॉटन ग्रीन, वरळी, भायखळ्यासोबत कांदिवली, बोरीवली, पवई आणि अंधेरीत पावसाने शहराच्या वेगात व्यत्यय आणला.

**पुढील दोन दिवस सरींचे**

अरबी समुद्रात कमी दाबाच्या क्षेत्राचे तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतर झाले आहे. त्यामुळे हवेतील ओलावा वाढत असून मेघगर्जनेसह अवेळी पाऊस कोसळत आहे. शनिवारसह रविवारीही मुंबईसह लगतच्या परिसरांना पावसाचा इशारा आहे. पुढील आठवड्यातील सुरुवातीचे दिवस मुंबई ढगाळ राहणार असून, पावसाचा अंदाज कायम आहे, अशी माहिती हवामान अभ्यासक अथ्रेय शेट्टी यांनी दिली.

**अमरावती शहरात सह ग्रामीण भागात जोरदार पावसाची हजेरी..**

अमरावतीत काल सकाळ पासून ढगाळ वातावरण होते, काल सुद्धा जोरदार पावसाने हजेरी लावली होती, तर आज शनिवार रोजी पुन्हा एकदा अमरावती शहरासह ग्रामीण भागात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे, ३० ऑक्टोबर पर्यंत अमरावतीमध्ये अशाच प्रकारे हलक्या ते मध्यम पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे, अचानक आलेल्या पावसामुळे मात्र अमरावतीकराची चांगलीचं तारांबळ उडाली आहे, अनेकांना पावसामुळे झाडाखाली आणि मिळेल त्या जागी आश्रय घ्यावा लागला.

**या जिल्ह्यात यलो अलर्ट**

२५ ऑक्टोबर : नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर,अमरावती

२६ ऑक्टोबर : मुंबई, नाशिक, खान्देश, अहिल्यानगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड,अमरावती

२७ ऑक्टोबर : धुळे, मुंबई, नाशिक, खान्देश, अहिल्यानगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर

२८ ऑक्टोबर : पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, रायगड, रत्नागिरी आणि नांदेड.

# राज्यात पेसा क्षेत्रातील आदिवासी शिक्षकांची १७ हजार ३३ पदे रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

राज्यातील १३ आदिवासी बहुल जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रात (पेसा) अनुसूचित जमातीच्या शिक्षकांची १७ हजार ३३ पदे रिक्त असल्याची धक्कादायक बाब शिक्षण आयुक्त पुणे यांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रधान सचिवांना पाठवलेल्या २४ जुलै २०२३ च्या पत्रातून पुढे आली आहे.जिल्हा परिषद अंतर्गत सन २०२२-२३ च्या संचमान्यतेनुसार पेसा क्षेत्रात रिक्त पदांची संख्या ११ हजार ४०० इतकी असून पेसा क्षेत्रातील 'एसटी' प्रवर्गाची रिक्त पदांची संख्या १७ हजार ३३ इतकी आहे.

सन २०२३ मध्ये झालेल्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीमध्ये एकूण पेसा क्षेत्रातील उमेदवारांची संख्या ७ हजार १६६ होती. यापैकी १ ली ते ५ वी आणि ६ वी ते ८ वी करिता टीईटी/सीटीईटी अर्हता धारण करणारे ४९०४ इतके उमेदवार होते. यात पेसातील बिगर आदिवासींचाही समावेश असून शिक्षण आयुक्तांच्या यादीत आदिवासींचा आकडा १५४४ इतकाच आहे. हे उमेदवार मात्र गेल्या एक वर्षापासून अद्यापही मानधनावर आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या ६ ऑक्टोबर २०२५ च्या निर्णयानंतरही त्यांना कायम नियुक्ती देण्यात आलेली नाही. पेसा क्षेत्रात निव्वळ रिक्त पदे व अनुसूचित जमातीतील पेसा क्षेत्रातील रिक्त पदे लक्षात घेतली तर उमेदवारांची संख्या ही रिक्त पदांपेक्षा कमी आहेत.

**हे आहेत पेसा क्षेत्रातील जिल्हे**

राज्यात ३६ जिल्ह्यांपैकी १३ जिल्हे आदिवासी बहुल आहेत. यात ठाणे, पालघर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, नांदेड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर, पुणे, अहमदनगर यांचा समावेश आहे.

# गांधी आश्रमात 'आपला उत्सव दिवाळी महोत्सव'

## आमदार रवी राणा यांच्या हस्ते सभामंडपाचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

दिवाळीच्या शुभपर्वावर अमरावतीतील गांधी आश्रम येथे 'आपला उत्सव दिवाळी महोत्सव' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार रवी राणा यांच्या हस्ते करण्यात आले.या उत्सवाच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीच्या विचारांची देवाण-घेवाण होऊन समाजात एकात्मतेचा संदेश पोहोचवण्याचा उद्देश ठेवण्यात आला होता. परिसरातील नागरिक, महिला व युवकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.यावेळी गांधी आश्रम परिसरात सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी




उभारण्यात आलेल्या दीड कोटी रुपये खर्चाच्या सभामंडप आणि वॉल कंपाऊंडचे लोकार्पण आमदार रवी राणा यांच्या हस्ते करण्यात आले. या नव्या सुविधेमुळे परिसरातील सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना चालना मिळणार आहे.आपला उत्सव दिवाळी महोत्सव' या कार्यक्रमाचे आयोजन सागर लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. कार्यक्रमात सांस्कृतिक, विनोदी आणि नृत्य सादरीकरणांद्वारे उपस्थितांनी दिवाळीचा आनंद साजरा केला.कार्यक्रमात संजय तिरथकर, गणेशदास गायकवाड, विनोद गुहे, अशोक पांडे, राजा बांगडे, भूषण पाटणे, पराग चिमोटे, साक्षी उमक, विजय गायकवाड, आशिष अतकरे, अमोल खंडारे, पोलीस निरीक्षक दिलीप वडगावकर, सागर लोखंडे, शुभम राऊत, सुरज डोंगरे, शुभम तायडे, शिव चव्हाण, अमोल सरकटे, योगेश खडसे, महेश खडसे, नीलेश दाहीडे, नीलेश वानखडे, सुमित सोनटक्के, कृष्णा वानखडे, गौरव खडसे, सुमित राऊत, केदार अंभोरे, आशिष तायडे, सागर अजाणकार, राजेश कांबळे, जुगल लोखंडे, विशाल खडसे, अविनाश आमटे, पवन लांडगे, पवन खडसे, गोकुळ वैरागडे, अभिषेक चव्हाण, आदित्य राऊत, अमोल थोरात, अमित गवई आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाने गांधी आश्रम परिसरात एकात्मता, संस्कृती आणि आनंदाचा सुंदर संगम घडवून दिवाळी साजरी करण्यात आली.

# जुन्या कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील

## घरची मुर्गी दाल बराबर म्हणत, नितीन गडकरींनी टोचले भाजप नेत्यांचे कान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नागपूर**

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर येथे झालेल्या एका कार्यक्रमात केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी या इनकमिंगच्या राजकारणावर भाष्य करत पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा थेट इशारा दिला आहे. पक्षात नवीन लोक येत असतील, तर ते स्वागतार्ह आहे; पण त्याचबरोबर जुन्या कार्यकर्त्यांच्या निष्ठेचा आणि कष्टांचा आदर ठेवला पाहिजे, असं म्हणत गडकरींनी पक्षातील काही नेत्यांना सूचक संदेश दिला.



राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असल्याने सर्वच राजकीय पक्षांमध्ये हालचालींना वेग आला आहे. भाजपमध्ये नव्या नेत्यांच्या प्रवेशाचा ओघ वाढत असताना, पक्षातील वरिष्ठ नेते गडकरी यांनी यावर रोखठोक प्रतिक्रिया दिली आहे.

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर येथे विकासकामांच्या भूमिपूजन कार्यक्रमात बोलताना गडकरी म्हणाले की, भाजपमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात नवीन लोकांचा ओघ आहे. हे चांगलं आहे, पण ज्यांनी पक्ष उभा केला, कठीण काळात काम केलं, त्यांना विसरून चालणार नाही. यावेळी मंचावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. गडकरी यांनी त्यांच्याकडे पाहत म्हटले की, बावनकुळे, जुन्या कार्यकर्त्यांकडे लक्ष द्या. तेच आपल्या पक्षाचं खरं बळ आहेत. निष्ठावंत कार्यकर्ते जर नाराज झाले, तर पक्ष कितीही मोठा झाला तरी एका दिवसात खाली येऊ शकतो. त्यांच्या या वक्तव्याने उपस्थितांमध्ये एकच कुजबुज सुरू झाली.

**घरची मुर्गी दाल बराबर**

या कार्यक्रमात गडकरी यांनी आपली खास नागपुरी शैली वापरत कार्यकर्त्यांना समजावलं. घरची मुर्गी दाल बराबर आणि बाहेरचं सावजी चिकन मसाला असं काहीतरी झालंय, असं म्हणत त्यांनी पक्षातील वातावरणाचं अचूक वर्णन केलं. त्यांनी डॉ. राजीव पोतदार यांचा उल्लेख करत सांगितलं की, तो प्रामाणिक, निष्ठावंत आणि जनतेशी जोडलेला कार्यकर्ता आहे. त्याने आपलं वैद्यकीय काम बाजूला ठेवलं आणि लोकांसाठी रात्रंदिवस फिरत राहिला. अशा लोकांकडे दुर्लक्ष करणं म्हणजे पक्षाचं नुकसान करणे. गडकरींनी बावनकुळे यांना थेट उद्देशून म्हटले की, डॉ. पोतदारसारख्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिलं नाही, तर पुढे अडचणी निर्माण होतील.

**जुन्या कार्यकर्त्यांना मागे सारले जात असल्याची नाराजी**

केंद्रीय मंत्र्यांच्या या वक्तव्याला राजकीय वर्तुळात मोठं महत्त्व दिलं जात आहे. भाजपमध्ये अलीकडे विविध पक्षांमधून आलेल्या नेत्यांना मोठ्या जबाबदाऱ्या देण्यात येत आहेत, तर जुन्या कार्यकर्त्यांना मागे सारलं जात असल्याची नाराजी तळागाळात आहे. अशा पार्श्वभूमीवर गडकरींचं हे भाषण म्हणजे नाराज कार्यकर्त्यांना दिलासा आणि पक्षातील उच्चस्तरावर एक इशारा असा दुहेरी अर्थ घेतला जातोय. त्यांच्या या विधानाने भाजपच्या अंतर्गत गटबाजीवरही पुन्हा प्रकाश टाकला आहे.

**भाजपमधील अनेक नेत्यांचे कान टोचले**

शेवटी गडकरींनी स्पष्टपणे सांगितलं की, राजकारणात निष्ठा, काम आणि जनतेशी असलेला संवाद हाच खरा पाया आहे. निवडणुका फक्त पैसा आणि प्रतिष्ठेच्या जोरावर जिंकल्या जात नाहीत. जुने कार्यकर्ते हेच पक्षाचं बळ आहेत. त्यांना विसरू नका, नाहीतर जेवढ्या वेगाने वर चढाल, तेवढ्याच वेगाने खालीही याल.

# विद्यार्थी हितासाठी ४थी व ७वीची शिष्यवृत्ती परीक्षेची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षात करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

शासन निर्णयान्वये इयत्ता ४ थी व ७ वी वर्गासाठी शिष्यवृत्ती परीक्षेचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे.मात्र सदर परीक्षेच्या निर्णयची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षात न करता पुढील शैक्षणिक वर्षापासून होणे न्यायसंगात होईल.अशी विनंती राज्यातील प्राथमिक शिक्षक संघटना यांनी राज्यात शालेय शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण राज्यमंत्री,प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,शिक्षण आयुक्त, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य यांना निवेदना व्दारे केली आहे. आपल्या राज्यातील शिष्यवृत्ती परीक्षा ही महत्वाची परीक्षा आहे. या परीक्षेची तयारी विद्यार्थी, शिक्षक व पालक फार गांभीर्याने करीत असतात. बहुतांश शिक्षक व विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी मागील शैक्षणिक वर्षाच्या मध्यापासून म्हणजे सुमारे दीड वर्षे तयारी करीत असतात. या कालावधीत काही शिक्षक छोटी-मोठी सुट्टीही घेत नाहीत. त्यामुळे परीक्षा तयारी चांगली होते.असे असताना वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार इयत्ता ४ व ७ वी या वर्गासाठी शिष्यवृत्ती परीक्षा फक्त ६ महिने अगोदर अधिकृतपणे जाहीर करणे ही बाब सदर इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी संयुक्तिक वाटत नाही. शिष्यवृत्तीसारखी महत्वाची परीक्षा किमान शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी दोन महिने अगोदर जाहीर होणे आवश्यक असताना शैक्षणिक सत्राच्या मध्यावर शिष्यवृत्ती परीक्षा अधिकृतपणे जाहीर झाल्याने व परीक्षेच्या तयारीसाठी ६ महिन्याचा कालावधी अत्यल्प असल्याने विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्यामध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे संदर्भीय शासन निर्णयाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षात (सन २०२६-२७) करणे न्यायसंगत होईल म्हणुन विद्यार्थी हितासाठी इयत्ता ४ थी व ७ वी शिष्यवृत्ती परीक्षा घेणेबाबत शासन निर्णयाची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षात न करता पुढील शैक्षणिक वर्षात (सन २०२६-२७) करावी अशी मागणी संघटना यांनी केली आहे.

### शासनाचा निर्णय स्वागतार्ह पण यावर्षी खूप उशीर झाला

शिष्यवृत्ती सारख्या महत्वाच्या परीक्षेबाबाताचा निर्णय किमान एप्रिल मध्ये जाहीर होणे आवश्यक होता. शिक्षक पहिल्या सत्रात अभ्यासक्रम पूर्ण करुन दुसऱ्या सत्रात सराव प्रश्न पत्रिका सोडवून घेत असतात. या वर्षी इथूनपुढे फक्त ६ महिन्यात इयत्ता ४ थी व ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेची चांगली तयारी होणे अशक्य असल्याने सदर परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात होणे संयुक्तिक होईल.



**राजेश सावरकर,राज्य प्रसिध्दी प्रमुख,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

# अभिनेते सतीश शाह यांचे निधन ७४ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

टीव्ही आणि बॉलिवूडमधील लोकप्रिय चेहरा अभिनेते सतीश शाह यांचं निधन झालं आहे. आज दुपारी २.३० वाजता हिंदुजा हॉस्पिटलमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ७४ वर्षांचे होते आणि किडनीच्या आजाराने त्रस्त होते. अनेक हिंदी सिनेमांमधून त्यांनी आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचं मन जिंकलं होतं. 'हम साथ साथ है', 'मै हूँ ना' ते टीव्हीवरील 'साराभाई व्हर्सेस साराभाई' मधील त्यांच्या भूमिका गाजल्या होत्या. त्यांच्या निधनाने मनोरंजनविश्वातून हळहळ व्यक्त होत आहे. उद्या २६ ऑक्टोबर रोजी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत.



सतीश शाह यांच्या निधनाने सर्वांनाच धक्का बसला आहे. ते हिंदुजा रुग्णालयात दाखल होते. किडनी फेल झाल्याने त्यांनी जगाचा निरोप घेतला. फिल्ममेकर अशोक पंडित यांनी व्हिडिओ शेअर करत सतीश शाह यांच्या निधनाची बातमी दिली. ते म्हणाले, हे सांगताना अत्यंत दुःख होत आहे की आपला प्रिय मित्र आणि दमदार अभिनेता सतीश शाहचं काही तासांपूर्वीच किडनी फेल झाल्यामुळे निधन झालं आहे.

# महिलांनो, स्वावलंबी बनायचेय; तर मग करा ऑनलाइन अर्ज

## १५ टक्के लाभार्थी हिस्सा रद्द : आदिवासींना उद्योगासाठी १०० टक्के अनुदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण' योजनेत राज्य सरकारने मोठा आणि ऐतिहासिक बदल केला असून, आता महिलांना उद्योग उभारणीसाठी लागणारे संपूर्ण (१०० टक्के) अनुदान मिळणार आहे.

यापूर्वी आदिवासी महिलांना १५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागत होता, जो ७ ऑगस्टच्या नवीन शासन निर्णयानुसार पूर्णपणे माफ करण्यात आला आहे. यामुळे आदिवासी महिलांना कोणत्याही आर्थिक भाराशिवाय स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.आदिवासी महिलांनी आदिवासी विकास विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज दाखल करून सदर अनुदान योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या वतीने करण्यातआले आहे.

**काय आहे नवीन निर्णय ?**

राज्याच्या आदिवासी



विकास विभागाने ७ ऑगस्ट २०२५ रोजी यासंबंधीचा महत्त्वपूर्ण शासन निर्णय जारी केला. या निर्णयामुळे 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजना' अधिक प्रभावी झाली आहे. या योजनेचा मूळ उद्देश आदिवासी समाजातील महिलांना शिक्षण, आरोग्य, प्रशासन, व्यवसाय, कृषी आणि स्वयंरोजगार यांसारख्या क्षेत्रांमध्ये सक्षम करणे हा आहे.

**... यासाठी मिळेल अनुदान**

कपडे विक्री किट, शेळी-मेंढी वाटप, गाय-म्हैस खरेदी, कुक्कुटपालन, कृषी पंप यांसारख्या वैयक्तिक योजनांसाठी; तसेच शिलाई मशीन, चहा स्टॉल, ब्युटी पार्लर सुरू करण्यासाठी लागणारे साहित्य, भाजीपाला स्टॉल, पत्रावळी बनविण्याचे यंत्र याशिवाय सामूहिक योजनांसाठी मसाला कांडप यंत्र, आटाचक्की, शुद्ध पेयजल युनिट, बेकरी उत्पादने आदींसाठी अनुदान देय आहे.

अमरावती जिल्ह्यात मेळघाट मधील आदिवासी अनुसूचित जमाती प्रवर्गात मोडतात. यामध्ये गोंड, राजगोंड, माडीया, परधान, बडामाडिया, गोंडगोवारी, माना व कंवर आदी जमातींचा समावेश आहे.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत